१४ वर्ष वर्धापन दिन

पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक ३४९ ■ रविवार, दि. २८ जून २०२६ ■ मुल्य ५ रुपये ■ पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com

राम मंदिर चोरी प्रकरण

## आठ आरोपींच्या घरी छापेमारी

**अयोध्या :** राम मंदिर देणगी चोरीच्या प्रकरणात सध्या कारागृहात असलेल्या आठ आरोपींच्या घरी रविवारी सकाळी ७ वाजता पोलिसांनी छापे टाकले. पोलिसांच्या आठ पथकांनी एकाच वेळी या आरोपींच्या निवासस्थानांवर छापे घातले. यापैकी तीन-चार आरोपींची घरे बंद आढळली; पोलिसांनी त्यांच्या शेजाऱ्यांकडे चौकशी केली आणि इतर आरोपींच्या कुटुंबीयांचीही विचारपूस केली.

छापेमारीत रामशंकर यादव (उर्फ 'टिन्नू') याचे घर बंद आढळले. त्यानंतर काही वेळाने टिन्नूची आई तिथे आली. तिने कुलूप उघडले. पोलीस काही अंतरावर असलेल्या दुसऱ्या आरोपीच्या म्हणजेच तिन्नूचा पुतण्या मनीष यादवच्या घरी पोहोचले, तेव्हा ते घरही बंद असल्याचे दिसून आले. त्याचप्रमाणे, तिसऱ्या आरोपीच्या, सुभाष चंद्र श्रीवास्तवच्या घरीही कोणीही आढळले नाही; ते घर बाहेरून कुलूप लावून बंद केलेले होते. आरोपी अनुकल्प मिश्रा याच्या घराबाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून, तिथे सध्या छापेमारी सुरू आहे. खरेदी केलेल्या मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे आणि बँक



खात्यांचा तपशील तपासला जात आहे. तसेच कुटुंबीयांचे जबाब नोंदवले जात आहेत. या छापेमारीच्या मोहिमेत महसूल विभागाचे अधिकारी, विशेषतः 'लेखपाल' (महसूल लेखापाल) यांचाही समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, मंदिर ट्रस्टचे सदस्य कृष्ण मोहन यांच्या तक्रारीवरून २५ जून रोजी दाखल करण्यात आलेल्या पहिल्या एफआयआरनंतर तिन्नूसह आठ आरोपींना अटक करण्यात आली होती. २६ जून रोजी मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाने या आरोपींना तीन दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली होती. दरम्यान, शनिवारी 'श्री राम जन्मभूमी ट्रस्ट'ने चंपत राय आणि अनिल मिश्रा यांच्या राजीनाम्याला दुजोरा दिला. राम मंदिरातील अर्पण (देणगी) चोरीला गेल्याच्या घटनेवर भाष्य करताना, समाजवादी पक्षाचे खासदार अवधेश प्रसाद यांनी सांगितले की, मंदिरात मोठा दरोडा पडला आहे. ही काही किरकोळ बाब नाही. हा केवळ राज्यापुरता मर्यादित विषय नसून तो संपूर्ण देश आणि जगाशी संबंधित आहे; कारण दररोज ५ ते १० लाख लोक येथे दर्शनासाठी येत असत. या परिस्थितीसाठी त्यांनी भाजपला जबाबदार धरले.


## देऊळगाव येथे सांत्वनासाठी आलेल्या पाहुण्याची कार पुरात वाहून गेली !

प्रतिनिधी २८ जून

♦ इसवीश्वर नाल्याला अचानक आलेल्या पुरामुळे थरार

**अकोला :** अकोला जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सलग मुसळधार पावसामुळे ग्रामीण भागातील नदी-नाल्यांना प्रचंड पूर आला आहे. अशातच तालुक्यातील देऊळगाव येथून एक थरारक आणि धक्कादायक घटना समोर आली आहे. गावातील एका मयताच्या घरी सांत्वनासाठी आलेल्या पाहुण्याची उभी असलेली चारचाकी कार इसवीश्वर नाल्याला आलेल्या अचानक पुरात काही क्षणांतच वाहून गेली. सुदैवाने, कारमध्ये कोणीही प्रवासी नसल्याने एक मोठा अनर्थ टळला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देऊळगाव येथील एका कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्याने, त्यांच्या नातेवाईक आणि परिचितांचे सांत्वन करण्यासाठी काही पाहुणे आले होते. त्यांनी आपली चारचाकी कार गावातील इसवीश्वर नाल्याजवळ पार्क केली होती. मात्र, परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे नाल्याच्या पाण्याच्या पातळीत अचानक कमालीची वाढ झाली. पाण्याचा वेग इतका तीव्र होता की, रस्त्या कडेला उभी असलेली ही कार काही क्षणांतच पाण्याच्या जोरदार प्रवाहात पत्त्याच्या बंगल्यासारखी वाहून गेली. नाल्याच्या रौद्ररूपापुढे कोणाचाही निभाव लागला नाही. हा सर्व थरार उपस्थितांनी आपल्या मोबाईल कॅमेऱ्यात कैद केला असून, या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत आहे. कार वाहून गेल्याने परिसरात काही काळ एकच खळबळ उडाली होती; परंतु वाहनात कोणीही नसल्याची खात्री पटल्यानंतर सर्वांनी सुटकेचा श्वास सोडला.



### 'धाडस करू नका'

सध्या जिल्ह्यातील पाऊस काहीसा ओसरला असला तरीही हवामान अजूनही ढगाळ आहे. डोंगराळ आणि ग्रामीण भागात पाणी साचले असल्याने नदी-नाल्यांचा प्रवाह अजूनही वेगवान आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. पूर आलेले नाले, नदी किंवा पुलावरून पाणी वाहत असताना रस्ता ओलांडण्याचा कोणताही जीवघेणा प्रयत्न करू नये, असे आवाहन प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.




## देवेंद्र फडणवीसांना महाराष्ट्रातच संपवण्याचा भाजपचा डाव – ठाकरे

प्रतिनिधी २८ जून

**परभणी :** आमच्या पक्षात कोणतीही अंतर्गत गटबाजी नाही, मात्र ती प्रत्येक ठिकाणी स्पष्टपणे दिसून येते. सध्या सुरू असलेले 'ऑपरेशन टायगर' हे वास्तवत: 'ऑपरेशन देवेंद्र' आहे का ? यात भाजपमधील अंतर्गत गटबाजी कारणीभूत असू शकते. देवेंद्र फडणवीस यांना दिल्लीत येऊ द्यायचे नसेल; कारण ते जर दिल्लीत गेले तर कोणाची तरी पंतप्रधानपदाची संधी हुकेल. म्हणूनच त्यांना महाराष्ट्रातच संपवून टाकण्याचा हा भाजपमधील अंतर्गत गटबाजीचा प्रकार असू शकतो, असा खळबळजनक आरोप उद्धव ठाकरे यांनी केला आहे. ते परभणी आणि हिंगोली दौऱ्यादरम्यान कार्यकर्त्यांशी संवाद साधताना बोलत होते. बंडखोर खासदारांवर कडाडून टीका





करताना उद्धव ठाकरे म्हणाले की, आमच्यासोबत निवडून आलेल्या खासदारांनी केवळ खाजगी निधीसाठी आमची साथ सोडली असून ते सर्व जण पैशांच्या आणि निधीच्या लालसेपोटी शिंदेंसोबत गेले आहेत. वास्तविक पाहता, केंद्र सरकारकडून जो खासदार फंड मिळतो, तोसुद्धा या खासदारांनी पूर्ण खर्च केलेला नाही. हे सर्व खासदार संसदेत आपल्या मतदारसंघाच्या प्रश्नांवर किती वेळा बोलले ? कोणत्या केंद्रीय मंत्र्यांकडे मतदारसंघाच्या विकासासाठी गेले ? या सर्वांचा कच्चाचिठ्ठा आणि संपूर्ण आढावा आमच्याकडे तयार आहे. उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, बंडू जाधव यांच्यासारख्या लोकांकडे जर आम्ही आधीच लक्ष दिले असते, तर त्यांच्या अनेक भानगडी आम्ही केव्हाच बाहेर काढल्या असत्या. आता केवळ वरवर बोलून चालणार नाही, तर गद्दारीच्या मुळावरच घाव घालावा लागणार आहे. मुंबईत गद्दारांचे शिरोमणी बसले आहेत. शिंदे सेनेच्या सर्व उमेदवारांना जनतेने निवडणुकीत ठरवून पाडले पाहिजे. जर या गद्दारांना आताच चिरडले नाही, तर हा देश वाचणार नाही. उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, परभणीकरांनी आमच्या पक्षाचा महापौर निवडून दिला, त्याबद्दल मी त्यांचे मनापासून आभार मानतो. मी आज सर्व कार्यकर्त्यांशी चर्चा करण्यासाठी आणि मतदारांची जाहीर क्षमा मागण्यासाठी येथे आलो आहे.

## अकोल्यासह २७ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट

**अकोला :** हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, राज्यातील २७ जिल्ह्यांना पावसाचा यलो अलर्ट जाहीर केला आहे. या जिल्ह्यांमध्ये पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, नाशिक घाट परिसर, अहिल्यानगर, पुणे, पुणे घाट परिसर, कोल्हापूर, कोल्हापूर घाट परिसर, सातारा, सातारा घाट परिसर, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, नांदेड, लातूर, धाराशिव, अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नागपूर, वर्धा, वाशिम आणि यवतमाळ यांचा समावेश आहे.

## ६१ वर्षीय नराधमाचा ५ वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार!

प्रतिनिधी २८ जून

**चंद्रपूर :** चंद्रपूर शहराजवळील एका वसाहतीत ५ वर्षीय चिमुकलीवर अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. घरा शेजारी राहणाऱ्या ६१ वर्षीय व्यक्तीकडून अत्याचार झाल्याची पोलिसांची माहिती, या प्रकरणात पॉक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी सेवानिवृत्त कर्मचारी असलेल्या आरोपीला अटक केली आहे, पडोली पोलीस या प्रकरणात पुढील तपास करत आहेत. या प्रकरणी पोलिसांनी तातडीने पावले उचलत नराधम आरोपीला बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापजनक वातावरण पसरले आहे. आरोपीला कठोर शिक्षा देण्याची मागणी होत आहे.

## लग्न मोडण्यापेक्षा केतनला संपवणं सोपं वाटलं !

♦ सिया गोयलची कबुली, केतन अग्रवाल हत्या प्रकरणाच्या तपासाला वेग

प्रतिनिधी २८ जून

**पुणे :** केतन अग्रवाल हत्या प्रकरणी तपासाला आता वेग आला आहे. सिया आणि तिचा प्रियकर चेतन चौधरी अटकेत आहेत.लग्न मोडण्यापेक्षा केतनची हत्या करणे सोपे वाटले, असे सियाने चौकशीत म्हटले आहे. तसेच नोव्हेंबरमध्ये होणारे लग्न मोडल्यास कुटुंबाच्या भावना दुखावल्या जातील, अशी सियाची भावना होती. त्यामुळे लग्न रद्द करण्याऐवजी होणाऱ्या पतीची हत्या करण्याचा निर्णय घेतल्याचे तिने चौकशीत सांगितल्याची पोलीस सूत्रांची माहिती आहे. केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी सियाचे वडील प्रवीण गोयल आणि आई पूजा गोयल यांची २७ जून रोजी चौकशी केली. लोहगडावरील केतन अग्रवाल हत्या प्रकरणातील आरोपी सिया गोयल आणि चेतन चौधरीची लोहगडावर आणून चौकशी करण्यात आली. केतन अग्रवाल हत्येप्रकरणातील लोहगडावर पोलिसांनी आज सकाळी ९ वाजता क्राईम सीनचं रिक्रिएशन केलं. केतनशी लग्न करायचे नसल्याने सियाने प्रियकर चेतन चौधरीसोबत मिळून कट रचल्याचा दोघांवर आरोप आहे.



### सियाने गुगलवर शोधले होते खून करण्याचे पर्याय

केतन अग्रवाल खून प्रकरणाच्या तपासात धाकदायक बाबी समोर आल्या आहेत. सिया आणि चेतनने गुगलवर खून करण्याचे पर्याय शोधले होते. पोलिसांना काय सांगायचे, चौकशीदरम्यान कोणती भूमिका घ्यायची आणि संपूर्ण घटना अपघातासारखी कशी भासवायची, याबाबतही दोघांमध्ये चर्चा झाल्याचा तपास यंत्रणांना संशय आहे. घटनेच्या काही दिवसांपूर्वी या दोघांनी लोहगड किल्ल्यावर जाऊन केतनला धक्का कसा द्यायचा, याचा सरावही केल्याची माहिती पोलीस तपासात उघड झाली आहे.

## मोहरमच्या मिरवणुकीत पेन किलरच्या नावावर उंदीर मारण्याच्या गोळ्यांचे वाटप !

सर्वात मोठा विषप्रयोग : भायखळयात हजारो भाविकांना संपविण्याचा कट

प्रतिनिधी २८ जून

**मुंबई :** मुंबईच्या इतिहासातील सर्वात मोठा विषप्रयोगाचा कट मुंबई पोलिसांनी उधळून लावला आहे. शुक्रवारी भायखळा परिसरात आयोजित करण्यात आलेल्या मोहरमच्या मिरवणुकीत सामील झालेल्या भाविकांना उंदीर मारण्याच्या विषाच्या (झिंक फॉस्फेट) गोळ्या वाटण्यात येत होत्या. हा प्रकार वेळीच लक्षात आल्यावर पेनकिलरच्या नावाखाली विषाच्या गोळ्या वाटणाऱ्या फैयाज प्रेमजी याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याच्याकडून १४ हजार ९०० कॅप्सूल जप्त केल्या. भाविकांना विषाच्या गोळ्या देण्यामागे फैयाज याचा नेमका कोणता उद्देश होता, याचा तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. भायखळा येथील मिरवणुकीत हजारोंच्या गर्दीमध्ये एक तरुण कॅप्सूल वाटत होता. मिरवणुकीत जखमा करून घेणाऱ्यांना त्रास होऊ नये म्हणून हर्बल पेन किलर गोळ्या असल्याचे तो सांगत होता. याचदरम्यान सलमान सय्यद याला उलट्या होऊ लागल्याने पोलिसांना संशय आला आणि त्यांनी फैयाज याच्याकडून जप्त करण्यात आलेल्या कॅप्सूलची तपासणी केली. दरम्यान, फैयाज याने ५० किलो झिंक फॉस्फेस्टची पावडर आणि ३० हजार रिकाम्या कॅप्सुलची ऑनलाइन ऑर्डर दिली होती. पुण्यातील विमाननगर परिसरात राहणारा फैयाज प्रेमजी हा १५ दिवसांपूर्वी मुंबईत आला होता. डोंगरी येथील एका हॉटेलमध्ये तो वास्तव्यास होता, असे तपासातून समोर आले आहे. भाविकांवर विषप्रयोग करण्याचा कट त्याचा एकट्याचाच आहे की, अन्य कुणाचा यामध्ये सहभाग आहे याचा तपास सुरु असल्याचे पोलिसांनी सांगितले.



### पोलिसांची गर्दीमध्ये स्पीकरवरुन घोषणा

◆ गर्दीत वाटल्या जाणाऱ्या गोळ्या विषारी असल्याचे समजल्यावर पोलिसांनी गर्दीमध्ये जाऊन स्पीकरवर घोषणा केली. यामुळे फैयाज याने वाटलेल्या कॅप्सूल अनेकांनी घेण्याचे टाळले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे अनेकांचे प्राण वाचले.

### घातपात की दहशतवादी कट?

पोलिसांनी अटक केलेल्या फैयाज याने इराण आणि इराकची वारी केल्याचे उघडकीस आलं आहे. उच्चशिक्षित असलेल्या फैयाजने केलेले हे कृत्य घातपात आहे की, दहशतवादी कट या तपास पोलिस करीत आहेत. यासाठी त्याचा मोबाइल, आर्थिक व्यवहार याची बारकाईने तपासणी केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले.



सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

रविवार दि. २८ जून २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# उड्डाणपुलावरील घाण पाणी वाहनधारकांच्या अंगावर !

**अकोला :** शहरातील रेल्वे स्टेशन ते अशोक वाटिका चौकादरम्यानच्या उड्डाण पुलावरील घाण पाणी या मार्गावरून येणाऱ्या-जाणाऱ्या वाहनधारकांच्या अंगावर पडत असल्यामुळे त्यांना त्रास सहन करावा लागत आहे. विशेष म्हणजे उड्डाण पुलावरील आउटलेटचे पाइप अनेक दिवसांपासून फुटलेले असून, ते पावसाळ्यापूर्वी दुरूस्ती करणे आवश्यक होते. मात्र ते दुरूस्त न करण्यात आल्यामुळे नागरिकांना अतोनात त्रास सहन करावा लागत आहे.

हे पाणी घाण असल्यामुळे संपूर्ण कपड्यांना दुर्गंधी सुटत असल्याने नागरिकांना सर्व कामधंदे सोडून घरी जाऊन कपडे बदलून यावे लागत आहे. याबाबत दखल घेऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# वृत्तपत्र हे केवळ कागदावरील शब्द नसतात तर समाजाचा आरसा आणि परिवर्तनाची ताकद असतात !



दररोज सकाळी आपल्या हातात येणारे वृत्तपत्र हे फक्त बातम्यांचे पान नसते; ते समाजाचा इतिहास लिहिणारे जिवंत दस्तऐवज असते. प्रत्येक मथळ्यामागे एका पत्रकाराचा संघर्ष, प्रत्येक बातमीमागे सत्याचा शोध आणि प्रत्येक शब्दामागे समाजाप्रती असलेली जबाबदारी दडलेली असते. म्हणूनच पत्रकारिता हा केवळ व्यवसाय नसून लोकशाहीचा सजग प्रहरी आहे.

एखादा रस्ता खड्ड्यांनी भरलेला असेल, एखाद्या गावात पाणी नसेल, शाळेत शिक्षकांची कमतरता असेल, रुग्णालयात उपचारांचा अभाव असेल किंवा एखाद्या सामान्य नागरिकावर अन्याय झाला असेल—तर त्या प्रश्नांना सर्वप्रथम आवाज देणारे माध्यम म्हणजे वृत्तपत्र. प्रशासनाच्या दारात अनेकदा दुर्लक्षित राहणारे प्रश्न, वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर झळकताच चर्चेचा विषय बनतात. हीच पत्रकारितेची खरी ताकद आहे. परंतु आज पत्रकारितेपुढेही मोठी आव्हाने आहेत. वेगाच्या स्पर्धेत सत्य हरवू नये, प्रसिद्धीच्या मोहात विश्वास तुटू नये आणि मतांच्या गदारोळात वस्तुस्थिती दबली जाऊ नये, याची काळजी घेणे अधिक महत्त्वाचे झाले आहे. समाजाला सनसनाटीपेक्षा सत्याची गरज आहे; अफवांपेक्षा विश्वासार्ह माहितीची गरज आहे आणि टीकेपेक्षा विधायक पत्रकारितेची गरज आहे.


एक जबाबदार वृत्तपत्र केवळ समस्या दाखवत नाही, तर समाजाला उपायांचा विचार करायलाही भाग पाडते. रक्तदान शिबिरे, पर्यावरण संवर्धन, व्यसनमुक्ती, शिक्षणासाठी मदत, महिला सुरक्षा, शेतकऱ्यांचे प्रश्न, युवकांना रोजगार, नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये—या प्रत्येक विषयावर सातत्याने जनजागृती करणे ही माध्यमांची सामाजिक बांधिलकी आहे.

आज गरज आहे अशा पत्रकारितेची, जी सत्तेला प्रश्न विचारेल; पण समाजालाही स्वतःचे कर्तव्य आठवण करून देईल. जी चुकीवर कठोरपणे बोट ठेवेल, पण चांगल्या कामालाही तितक्याच ताकदीने व्यासपीठ देईल. कारण प्रेरणादायी बातम्या समाजात आशा निर्माण करतात आणि आशेतूनच परिवर्तनाची सुरुवात होते.

लेखणीमध्ये तलवारीपेक्षाही मोठी ताकद असते, असे म्हटले जाते. ही ताकद लोकांना तोडण्यासाठी नाही, तर जोडण्यासाठी वापरली गेली पाहिजे. पत्रकाराचा प्रत्येक शब्द एखाद्याला न्याय मिळवून देऊ शकतो, एखाद्या गावाचा विकास घडवू शकतो, एखाद्या कुटुंबाला आधार देऊ शकतो आणि एखाद्या चुकीच्या व्यवस्थेला जागे करू शकतो.

म्हणूनच वृत्तपत्र हे केवळ माहितीचे साधन नाही; ते समाजाचा विवेक आहे. आणि जोपर्यंत लेखणी सत्य, न्याय आणि समाजहितासाठी चालत राहील, तोपर्यंत लोकशाहीचा श्वास जिवंत राहील.

कारण काळ बदलतो, सत्ता बदलते, चेहरे बदलतातष्ठ पण सत्यासाठी लढणारी लेखणी आणि समाजासाठी उभी राहणारी पत्रकारिता कधीच पराभूत होत नाही.



नेहा पाटील
अँकर अँड रिपोर्टर
आर आर सी न्यूज अकोला

# बंगाली कादंबरीकार बंकिमचंद्र चॅटर्जी

बंकिमचंद्र चट्टोपाध्याय (चॅटर्जी) यांचा जन्म २६ जून १८३८ रोजी कथलपारा, नैहाटी (बंगाल) येथे झाला. ते कमलाकंठ या टोपणनावाने ओळखले जात. ते वंदे मातरम गीताचे जनक म्हणून प्रसिद्ध आहेत. बंकिमचंद्र चट्टोपाध्याय सीआयई (इंग्रजीमध्ये बंकिमचंद्र चॅटर्जी असे लिहिले जाते. ते एक बंगाली कादंबरीकार, कवी, निबंधकार आणि पत्रकार होते. आपल्या ब्रिटिशधार्मी भूमिकेसाठी ओळखले जाणारे, त्यांनी ब्रिटिश राजवटीची वैधता स्वीकारली आणि इंग्रजी शिक्षणाचे समर्थन केले. त्यांनी १८८२ साली 'आनंदमठ' ही बंगाली भाषेतील कादंबरी लिहिली. जी आधुनिक बंगाली आणि भारतीय साहित्यातील एक मैलाचा दगड मानली जाते. त्यांनी अत्यंत संस्कृतप्रचुर बंगालीमध्ये लिहिलेल्या 'वंदे मातरम' या रचनेचे लेखन केले , ज्यात भारताला मातृदेवतेच्या रूपात चित्रित केले आहे. चट्टोपाध्याय यांनी बंगालीमध्ये चौदा कादंबऱ्या आणि अनेक गंभीर, गंभीर-विनोदी, व्यंग्यात्मक, वैज्ञानिक आणि समीक्षात्मक ग्रंथ लिहिले . बंगालीमध्ये त्यांना ' साहित्य सम्राट ' म्हणून ओळखले जाते.




चट्टोपाध्याय यांना बंगालच्या तसेच व्यापक भारतीय उपखंडातील साहित्यिक पुनर्जागरणातील एक प्रमुख व्यक्तिमत्व म्हणून मोठ्या प्रमाणावर ओळखले जाते. त्यांचे काही लेखन, ज्यात कादंबऱ्या, निबंध आणि भाष्ये यांचा समावेश आहे, ते पारंपारिक पद्य-आधारित भारतीय लेखनापासून वेगळे होते आणि संपूर्ण भारतातील लेखकांसाठी प्रेरणास्थान ठरले. त्याच्या लेखनात, त्यांनी मुस्लिमांना जुलमी आणि हिंदूंना बळी म्हणून चित्रित करण्यासाठी काल्पनिक पात्रांचा वापर केला. त्यांनी असा निष्कर्ष काढला की जर ब्रिटिशांनी दक्षिण आशिया सोडले तर मुस्लिम हिंदूंवर राज्य करतील.

चट्टोपाध्याय यांचे सुरुवातीचे लेखन ईश्वरचंद्र गुप्ता यांच्या ' संगबाद प्रभाकर' या साप्ताहिकात प्रकाशित झाले होते. कथालेखनाकडे वळण्यापूर्वी त्यांनी आपल्या साहित्यिक कारकिर्दीची सुरुवात कवी म्हणून केली. त्यांचा पहिला प्रयत्न एका घोषित पारितोषिकासाठी सादर केलेली बंगाली कादंबरी होती. त्यांना ते पारितोषिक मिळाले नाही आणि ती लघुकादंबरी कधीही प्रकाशित झाली नाही. त्यांची मुद्रित स्वरूपात आलेली पहिली कथा ' राजमोहन'स वाईफ' ही इंग्रजी कादंबरी होती. २१ . 'दुर्गेष्णांदिनी' , त्यांची पहिली बंगाली प्रणयकाव्य आणि बंगालीतील पहिली कादंबरी, १८६५ मध्ये प्रकाशित झाली. त्यांचा 'शकुंतला, मिरांडा एबोंग डेस्डेमोना' (१८७३) हा निबंध बंगालीतील विविध साहित्यांच्या तुलनात्मक विश्लेषणाचा पहिला प्रयत्न मानला जातो आणि जादवपूर विद्यापीठाच्या तुलनात्मक साहित्य शाळेत त्याचा सखोल अभ्यास केला जातो. 'वंदे मातरम' (मी माझ्या मातृभूमीची पूजा करतो, कारण ती खरोखरच माझी आई आहे) या गीताचा स्त्रोत देखील होती, ज्याला रवींद्रनाथ टागोर यांनी संगीतबद्ध केले आणि अनेक भारतीय राष्ट्रवाद्यांनी ते स्वीकारले, आणि आता ते राष्ट्रगीत आहे; तथापि, अखेरीस त्यांनी हे मान्य केले की ब्रिटिश साम्राज्याचा पराभव होऊ शकत नाही. ही कादंबरी सर्वप्रथम चट्टोपाध्याय यांनी १८७२ मध्ये स्थापन केलेल्या 'बंगदर्शन' या साहित्यिक मासिकात क्रमशः प्रकाशित झाली. लॉर्ड कर्झनने बंगालची हिंदू बहुल पश्चिम आणि मुस्लिम बहुल पूर्व अशा दोन भागांत विभागणी करण्याच्या प्रयत्नामुळे सुरू झालेल्या स्वदेशी चळवळीदरम्यान 'वंदे मातरम' प्रसिद्ध झाले. बंगाली हिंदूंच्या शक्ती परंपरेतून प्रेरणा घेऊन, चट्टोपाध्याय यांनी भारताला 'भारत माता' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या मातृदेवीच्या रूपात व्यक्तिमत्व दिले , ज्यामुळे या गीताला एक हिंदू संदर्भ प्राप्त झाला.

# भारताचे 'आर्थिक' शिल्पकार : पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव !

पामुलापर्ती वेंकट नरसिंह राव म्हणजे पी. व्ही. नरसिंह राव हे भारताचे नववे पंतप्रधान होते. १९९१ ते १९९६ या काळात त्यांनी देशाचे नेतृत्व केले. भारतामध्ये 'नवीन आर्थिक धोरण' लागू करून देशाच्या अर्थव्यवस्थेला जागतिक पातळीवर खुली करण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यांना देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान 'भारतरत्न' देऊन मरणोत्तर गौरविण्यात आले आहे. पी.व्ही. नरसिंह राव यांचा जन्म २८ जून १९२१ मध्ये लाकनेपल्ली, अविभाजित आंध्र प्रदेश येथे झाला. हैदराबादच्या उस्मानिया विद्यापीठासह मुंबई आणि नागपूर विद्यापीठातून त्यांचे शिक्षण झाले. नागपूरच्या हिस्लॉप कॉलेज आणि मुंबई विद्यापीठातून त्यांनी कायद्याची पदवी घेतली. भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात त्यांनी सक्रिय सहभाग नोंदवला होता.त्यांनी केंद्रात परराष्ट्र मंत्री, गृहमंत्री आणि संरक्षण मंत्री ही महत्त्वाची पदे सांभाळली आहेत. १९९१ च्या लोकसभा निवडणुकीनंतर कॉंग्रेस पक्षाने त्यांना पंतप्रधानपदी बसवले.



आज जयंती

१९९१ मध्ये भारतावर मोठे आर्थिक संकट होते. नरसिंह राव यांनी अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या साथीने 'उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण' आणून देशाची अर्थव्यवस्था रुळावर आणली. त्यांचे महाराष्ट्राशी अत्यंत जवळचे नाते होते. त्यांनी नागपूर जवळील रामटेक लोकसभा मतदारसंघातून दोनदा निवडणूक जिंकली होती.त्यांच्याच पुढाकारामुळे रामटेक येथे 'कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठा'ची स्थापना झाली. त्यांना तेलुगू व्यतिरिक्त इंग्रजी, हिंदी आणि अस्खलित मराठी भाषेचे उत्कृष्ट ज्ञान होते. त्यांचे निधन २३ डिसेंबर २००४ रोजी नवी दिल्ली येथे झाले.

### राजकारणात प्रवेश

त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात आणि स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखालील हैद्राबाद मुक्तिसंग्रामात भाग घेतला. सर्वप्रथम ते इ.स. १९६२ साली केंद्रीय मंत्री झाले. ते इ.स. १९७१पर्यंत केंद्रात मंत्री होते. इ.स. १९७१ ते इ.स. १९७३ या काळात ते आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री होते. त्यानंतर परत ते केंद्रीय राजकारणात उतरले. त्यानंतर त्यांनी गृह, परराष्ट्र आणि संरक्षण यासारखी महत्त्वाची खाती सांभाळली. इ.स. १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचे अनेक वरिष्ठ नेते पराभूत झाले. पण राव हनामकोंडा मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले. ते इ.स. १९८४ आणि इ.स. १९८९ च्या निवडणुकीत महाराष्ट्रातील रामटेक मतदारसंघातून लोकसभेवर निवडून गेले.

### पंतप्रधानपद

राजकारणातून निवृत्त होण्याच्या उद्देशाने त्यांनी इ.स. १९९१ची लोकसभा निवडणुक लढवली नाही. मात्र निवडणूक प्रचारादरम्यान कॉंग्रेस पक्षाचे अध्यक्ष आणि पंतप्रधानपदाचे उमेदवार राजीव गांधी यांची हत्या झाली. त्यानंतर राव यांची कॉंग्रेस पक्षाच्या अध्यक्षपदी सर्वानुमते निवड झाली. लोकसभा निवडणुकीचे निकाल लागल्यावर कॉंग्रेस पक्ष केंद्रात सरकार बनविण्याच्या स्थितीत होता. पक्षाचे नेते म्हणून राव यांची निवड झाली आणि त्यांनी २१ जून १९९१ रोजी भारताचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. नरसिंह रावांच्या सरकारपुढे देशाची आर्थिक स्थिती सांभाळण्याचे मोठे आव्हान होते. त्यांनी मनमोहन सिंग या निष्णात अर्थतज्ज्ञाची अर्थमंत्री म्हणून नेमणूक केली. देशाची आर्थिक स्थिती सांभाळण्यासाठी आंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्ज मिळवणे गरजेचे होते. आणि त्यासाठी रुपयाचे अवमूल्यन आणि खतांवरील सरकारी अनुदान कमी करणे असे जनतेत लोकप्रिय नसलेले निर्णय सरकारला घ्यावे लागले. नरसिंह राव सरकारने सत्तेवर आल्यानंतर दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दहशतवादग्रस्त पंजाब राज्यातील निवडणुका फेब्रुवारी, इ.स. १९९२मध्ये घेतल्या. त्यानंतर बियंत सिंग यांच्या नेतृत्वाखाली लोकनियुक्त सरकार अधिकारारूढ झाले. त्या सरकारने इ.स. १९९२ आणि इ.स. १९९३ सालांदरम्यान दहशतवादाविरुद्ध कठोर पावले उचलून राज्यात शांतता निर्माण केली. तसेच अर्थमंत्री मनमोहन सिंग यांनी फेब्रुवारी, इ.स. १९९२ मध्ये परकीय गुंतवणुकीला पोषक अर्थसंकल्प सादर केल्यामुळे शेअर बाजारात तेजीचे वातावरण होते. मात्र मे, इ.स. १९९२मध्ये हर्षद मेहता आणि इतर काही शेअर दलालांनी केलेला हजारो कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीला आला. त्यानंतर उद्योगात आणि शेअर बाजारात मंदीचे वातावरण निर्माण झाले. जुलै, इ.स. १९९२मध्ये नरसिंह राव सरकार शेअर बाजारातील घोटाळा वेळीच थांबवू शकले नाही, असा आरोप करून लोकसभेतील सर्व विरोधकांनी सरकारविरुद्ध अविश्वास प्रस्ताव आणला. पण तो फेटाळला गेला.

### बाबरी मशीद

जुलै, इ.स. १९९२मध्ये विश्व हिंदू परिषद आणि भारतीय जनता पक्ष या संघटनांनी अयोध्येत वादग्रस्त जागी बाबरी मशिदीच्या जागी राममंदिर बांधण्यासाठी कारसेवा सुरू केली. पण नरसिंह रावांनी मध्यस्थी करून ४ महिन्यांचा वेळ मागून घेतला आणि त्या काळात त्या प्रश्नावर तोडगा काढायचे आश्वासन दिले. सरकार दिलेल्या कालावधीत तोडगा काढण्यात अपयशी ठरणार असे दिसताच विश्व हिंदू परिषद आणि भारतीय जनता पक्ष यांनी ६ डिसेंबर १९९२ पासून अयोध्येत परत कारसेवा सुरू करायचा निर्णय घेतला. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री कल्याण सिंग यांनी न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करून बाबरी मशिदीला धक्का लावण्यात येणार नाही असे आश्वासन दिले. पण अयोध्येत कारसेवकांनी बाबरी मशीद उद्ध्वस्त केली. त्याच दिवशी सायंकाळी केंद्र सरकारने कल्याण सिंग यांचे सरकार बरखास्त करून राज्यात राष्ट्रपती राजवट लागू केली. जुलै, इ.स. १९९३मध्ये राव सरकारविरुद्ध सर्व विरोधकांनी तिसरा अविश्वास प्रस्ताव आणला. पण तो २५१ विरुद्ध २६५ मतांनी फेटाळला गेला आणि सरकार थोडक्यात बचावले.

# धागे तुटतात तेव्हा आयुष्य शिकवतं!

जीवन हे एका सुई-दोऱ्याच्या नात्यासारखे असते. कधी धागे घट्ट विणले जातात, तर कधी अचानक तुटून जातात. पण प्रत्येक तुटलेला धागा हा केवळ वेदनेचा क्षण नसतो तर तो आयुष्याने दिलेला एक धडा असतो. 'फाटकं असो वा तुटकंष्ठ नशीब सोडून सगळं काही शिवता येतं' हा साधा वाटणारा संदेश जीवनाच्या गाभ्याला स्पर्श करणारा आहे. आजच्या काळात माणूस सर्व काही मिळविण्याच्या स्पर्धेत इतका गुंतला आहे की, अपयश किंवा तुटलेले नाते स्वीकारण्याची त्याची क्षमता कमी होत चालली आहे. एक परीक्षा नापास झाली की आयुष्य संपल्यासारखे वाटते. एखादा व्यवसाय तोट्यात गेला की जगण्याचा अर्थ हरवतो. एखाद्या नात्यात फट पडली की स्वतःचे अस्तित्वच निरर्थक वाटू लागते. परंतु निसर्गाचा नियम वेगळा आहे. जे तुटते ते पुन्हा जोडता येते, जे हरवते ते पुन्हा कमावता येते, मात्र त्यासाठी धैर्य, संयम आणि प्रयत्नांची सुई हाती घ्यावी लागते.



एक शिंपी फाटलेले कपडे शिवतो. तो कपड्याला दोष देत बसत नाही. तो सुटलेले धागे शोधतो, सुईत दोरा ओवतो आणि पुन्हा त्याला आकार देतो. माणसाचे आयुष्यही असेच आहे. संकटे, अपयश, दुःख, विश्वासघात हे सर्व आयुष्याला फाडून टाकतात. पण प्रश्न असा आहे की, आपण त्याला शिवण्याचा प्रयत्न करतो का? की नशिबाला दोष देत बसतो? आज समाजात नशिबवाद मोठ्या प्रमाणावर वाढताना दिसतो. 'माझ्या नशिबातच नाही', 'देवानेच असे लिहिले आहे', 'माझे कर्मच वाईट आहे' अशा वाक्यांमुळे प्रयत्नांची शक्ती कमकुवत होते. प्रत्यक्षात इतिहासातील प्रत्येक परिवर्तन हे नशिबावर नव्हे तर जिद्दीवर घडले आहे. महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जर नशिबावर विश्वास ठेवला असता, तर समाज परिवर्तनाचा इतिहास कधीच घडला नसता. त्यांनी परिस्थितीला दोष न देता परिस्थिती बदलण्याचे धाडस केले.

आजच्या तरुण पिढीसमोर सर्वात मोठे आव्हान म्हणजे अपयश सहन करण्याची क्षमता कमी होणे. सोशल मीडियाच्या झगमगाटात प्रत्येकाला यशाचे प्रदर्शन दिसते, पण त्या यशामागील संघर्ष दिसत नाही. त्यामुळे स्वतःचे जीवन इतरांशी तुलना करताना अनेकजण नैराश्याच्या गर्तेत जातात. एखादा विद्यार्थी कमी गुण मिळाल्यामुळे खचतो, शेतकरी पीक नष्ट झाल्यामुळे निराश होतो, बेरोजगार युवक नोकरी न मिळाल्यामुळे स्वतःलाच दोष देतो. पण हे विसरले जाते की, तुटलेले धागे पुन्हा जोडण्यासाठी वेळ लागतो. जीवनात प्रत्येकाला काही ना काही गमवावे लागते. कोणाचे बालपण गरिबीत जाते, कोणाचे शिक्षण अर्धवट राहते, कोणाला नात्यांमध्ये फसवणूक सहन करावी लागते, तर कोणाला सामाजिक अन्यायाचा सामना करावा लागतो. पण या सर्व वेदना माणसाला अधिक सक्षम बनवू शकतात. कारण जखम जितकी खोल, तितकी शिकवण मोठी असते.

समाजातही हेच लागू पडते. एखाद्या समाजावर अन्याय झाला, त्याचे हक्क हिरावले गेले, त्याची प्रतिष्ठा तुडवली गेली, तरी तो समाज पुन्हा उभा राहू शकतो. मात्र त्यासाठी आत्मविश्वासाची सुई आणि एकतेचा दोरा आवश्यक असतो. विखुरलेल्या धाग्यांनी वस्त्र तयार होत नाही. तसेच विभागलेल्या समाजाने परिवर्तन घडत नाही. म्हणूनच संघर्षाच्या काळात एकजूट ही सर्वात मोठी ताकद ठरते. आज अनेक कुटुंबे तुटत आहेत. संवादाचा अभाव, अहंकार, आर्थिक स्पर्धा आणि भौतिक अपेक्षा यामुळे नात्यांचे धागे कमकुवत होत आहेत. नात्यांमध्ये आलेल्या छोट्या फटी वेळेवर शिवल्या गेल्या नाहीत तर त्या मोठ्या दरीत बदलतात. क्षमा, समजूतदारपणा आणि संवाद हे नात्यांना शिवणारे दोरे आहेत. जेव्हा हे दोरे तुटतात तेव्हा माणूस गर्दीत असूनही एकटा पडतो. या चित्रातील सुई आणि दोरा केवळ शिवणकामाचे साधन नाहीत, तर ते जीवनाचे तत्त्वज्ञान आहेत. सुई टोचते, पण जोडते. संघर्षही तसाच असतो. तो वेदना देतो, पण आयुष्याला आकारही देतो. दोरा स्वतःला झिजवत जातो, पण फाटलेले कपडे एकत्र ठेवतो. समाजातील कार्यकर्ते, शिक्षक, लेखक, पत्रकार आणि संवेदनशील नागरिक यांची भूमिकाही अशीच असते. ते स्वतःच्या सुखाचा त्याग करून समाजातील तुटलेले धागे जोडण्याचा प्रयत्न करतात. आपल्या देशात आज द्वेष, जातीयता, धार्मिक ध्रुवीकरण, आर्थिक विषमता आणि सामाजिक तणाव वाढताना दिसत आहे.

या परिस्थितीत समाजाला तोडणाऱ्यांची संख्या वाढली आहे, पण जोडणाऱ्यांची गरज अधिक आहे. कारण तोडणे सोपे असते, जोडणे कठीण असते. एका क्षणात विश्वास तुटतो, पण तो पुन्हा निर्माण करण्यासाठी वर्षे लागतात. म्हणूनच प्रत्येकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे की, आपण आयुष्यात तुटलेल्या गोष्टींचा शोक करत बसणार आहोत की त्या पुन्हा शिवण्याचा प्रयत्न करणार आहोत? कारण नशिब आपल्या हातात नसते पण प्रयत्न, विचार, संघर्ष आणि कृती आपल्या हातात असतात. आणि अनेकदा हेच प्रयत्न नशिबालाही बदलून टाकतात.

फाटलेले कपडे शिंपी शिवू शकतो. तुटलेले नाते प्रेम शिवू शकते. खचलेले मन आशा शिवू शकते. विखुरलेला समाज एकता शिवू शकते. पण त्यासाठी हातात सुई घ्यावी लागते, दोरा ओवावा लागतो आणि संयमाने काम करावे लागते.



प्रवीण बागडे
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# 'उतरत्या वयात योगाची साथ; निरोगी, आनंदी आणि स्वावलंबी आयुष्याचा खरा मंत्र !

आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे केवळ तरुणच नव्हे तर ज्येष्ठ नागरिकांनाही विविध शारीरिक व मानसिक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वाढते वय, बदलती जीवनशैली, अपुरा व्यायाम आणि तणाव यामुळे अनेक वृद्धांना मधुमेह, रक्तदाब, सांधेदुखी, पाठदुखी, निद्रानाश, श्वसनाचे विकार आणि नैराश्य यांसारख्या समस्यांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत औषधांबरोबरच नियमित योगाभ्यास हा निरोगी आणि आनंदी जीवनाचा प्रभावी मार्ग ठरतो.

योग म्हणजे केवळ शरीर वाकविण्याचा व्यायाम नसून शरीर, मन आणि श्वास यांचा समतोल साधणारी जीवनशैली आहे. नियमित योगाभ्यासामुळे शरीराची लवचिकता वाढते, स्नायूंना बळकटी मिळते, सांधे कार्यक्षम राहतात आणि शरीराचा समतोल सुधारतो. त्यामुळे पडून दुखापत होण्याचा धोका कमी होतो. तसेच श्वसनक्रिया सुधारल्याने फुफ्फुसांची कार्यक्षमता वाढते आणि शरीराला अधिक ऊर्जा मिळते.


ज्येष्ठ नागरिकांसाठी प्राणायाम, ध्यान, ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, वज्रासन, शवासन यांसारखी सोपी योगासने अतिशय उपयुक्त ठरतात. नियमित योगामुळे रक्तदाब नियंत्रित राहण्यास मदत होते, मधुमेहावर नियंत्रण ठेवण्यास सहाय्य मिळते, हृदयाचे आरोग्य सुधारते आणि पचनक्रिया सुरळीत राहते. शरीरातील रक्ताभिसरण सुधारल्याने दिवसभर उत्साह आणि स्फूर्ती टिकून राहते. योगाचा सर्वात मोठा फायदा मानसिक आरोग्यावर होतो. निवृत्तीनंतर अनेक ज्येष्ठ नागरिक एकटेपणा, चिंता किंवा नैराश्याचा अनुभव घेतात. ध्यान आणि प्राणायामामुळे मन शांत राहते, तणाव कमी होतो, सकारात्मक विचार वाढतात आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. परिणामी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक बनतो.

आज अनेक ठिकाणी ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष योगवर्ग आयोजित केले जात आहेत. सकाळच्या शांत वातावरणात सामूहिक योगाभ्यास केल्याने केवळ आरोग्यच सुधारत नाही, तर सामाजिक संवादही वाढतो. नवीन मित्रपरिवार तयार होतो आणि जीवनात आनंदाची नवी उमेद निर्माण होते.



तज्ज्ञांच्या मते, कोणताही योगाभ्यास सुरू करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. आपल्या शारीरिक क्षमतेनुसार प्रशिक्षित योगशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली योग केल्यास त्याचा अधिक सुरक्षित आणि चांगला लाभ मिळतो. वृद्धत्व ही जीवनाची नैसर्गिक अवस्था असली तरी ती आजारपणाची ओळख ठरू नये. नियमित योग, संतुलित आहार आणि सकारात्मक विचार यांच्या मदतीने ज्येष्ठ नागरिक दीर्घकाळ निरोगी, स्वावलंबी आणि आनंदी जीवन जगू शकतात. म्हणूनच प्रत्येक घरातील ज्येष्ठांनी योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवणे ही काळाची गरज आहे.

'औषधांपेक्षा नियमित योगाची सवय अधिक प्रभावी ठरते. निरोगी शरीर, शांत मन आणि आनंदी वृद्धत्वासाठी योग हाच खरा जीवनमंत्र आहे.'



प्रशांत वाहूरवाघ
योग विशेषज्ञ
प्रोफेशनल फिटनेस ट्रेनर

# पायऱ्यांवर बसून 'दोन थेंब जीवनाचे'; पल्स पोलिओ मोहिमेतील बुथवर अव्यवस्थेचे चित्र

प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत रविवारी जिल्ह्यासह शहरातील विविध भागांमध्ये ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात आले. पोलिओसारख्या गंभीर आजारापासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी ही मोहीम राबविण्यात येत असून, एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये यासाठी आरोग्य विभागाचे अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच अंगणवाडी सेविका परिश्रम घेत आहेत.

मात्र, शहरातील अनेक पोलिओ बुथांवर मूलभूत सुविधांचा अभाव असल्याचे चित्र दिसून आले. पावसापासून संरक्षणासाठी शेड, बसण्याची व्यवस्था तसेच उन्हापासून बचावासाठी आवश्यक सुविधा अनेक ठिकाणी उपलब्ध नव्हत्या. परिणामी, कर्मचारी उघड्यावरच काम करत असल्याचे दिसून आले.



विशेष म्हणजे, शहरातील गांधी चौक परिसरातील तोष्णीवाल दवाखाना येथे पोलिओ बुथची व्यवस्था करण्यात आली होती. संबंधित दवाखाना बंद असल्याने आरोग्य कर्मचारी समोरील दवाखान्याच्या पायऱ्यांवर बसून लहान बालकांना पोलिओचे डोस देत आपले कर्तव्य पार पाडताना दिसले. उन्हाच्या कडक तापात तसेच अपुऱ्या सुविधांमध्येही कर्मचाऱ्यांनी मोहिमेची जबाबदारी प्रामाणिकपणे निभावली.

राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाच्या आरोग्य मोहिमेत अशा प्रकारची अव्यवस्था समोर आल्याने प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. आरोग्य कर्मचाऱ्यांना आवश्यक सुविधा उपलब्ध करून देत भविष्यात अशा मोहिमांचे अधिक प्रभावी नियोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## आज आकाशात स्ट्रॉबेरी मुन

**अकोला :** आज आकाशात निज ज्येष्ठ शुक्ल आणि वटपौर्णिमेचा चंद्र स्ट्रॉबेरी मुन म्हणून ओळखल्या जातो. अमेरिकेत यावेळी जंगली स्ट्रॉबेरीचा हंगाम असतो.पृथ्वीभोवती काहिसा लंबवर्तुळाकार फिरणारा हा चंद्र यावेळी सरासरी अंतरापेक्षा सुमारे वीस हजार किलोमीटर अधिक अंतरावर असल्याने चंद्राचा आकार लहान आणि प्रकाश नेहमीपेक्षा कमी राहतो म्हणून त्याला मायक्रो मून म्हणून ओळखतात.फक्त

नेहमीच्या निरीक्षकांना हा फरक जाणवेल. आकाश प्रेमिंनी हा नजारा अनुभवण्याचे आवाहन विश्वभारती केंद्राद्वारे करण्यात येत आहे. आजचा चंद्रोदय ६-५१ वा.अर्थात सूर्यास्ता आधी दहा मिनिटे, पृथ्वी चंद्र अंतर ४,०५,६५० कि.मी.एवढे असेल तर चंद्रास्त सूर्योदयापूर्वी चार मिनिटे होईल.दिवस पावसाचे असले तरी ढगां सोबतचा लपंडाव बघता येईल. आज वटपौर्णिमा मानवी जीवनात निसर्ग भूमिका महत्वाची व मोलाची आहे ?.आपल्या कडे सुमारे ९-१० महिने आकाश स्वच्छ असते म्हणून विदेशी खगोल अभ्यासक आकाश निरिक्षणासाठी भारतात येतात. आपल्या घरा, आकाशातील विविध नजारे दूर्लक्षित न करता मनसोक्त आनंद घ्यायला हवा. सूर्य, चंद्र, ग्रह तारे आपले मित्र, त्यांच्याशी मैत्री दृढ व्हावी यासाठी विश्वभारती सदैव आपल्या सोबतीला असेल.

# 0 ते 5 वर्षांतील प्रत्येक बालकाला पोलिओची लस द्या : खा. अनुप धोत्रे



प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत जिल्हा महिला रुग्णालयात उत्साहपूर्ण वातावरणात मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

खासदार अनुप धोत्रे यांच्या हस्ते बालकांना पोलिओ प्रतिबंधक लस पाजून मोहिमेची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

खासदार अनुप धोत्रे यांनी पोलिओमुक्त भारताचे यश कायम राखण्यासाठी प्रत्येक पालकाने आपल्या ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकाला पल्स पोलिओची लस अवश्य द्यावी, असे आवाहन केले.

कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बळीराम गाढवे, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. आरती कुलवाल, जिल्हा माता-बाल आरोग्य अधिकारी डॉ. विनोद करंजेकर, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. मनिष शर्मा, वैद्यकीय अधीक्षक डॉ. बापूराव पवार तसेच आरोग्य विभागातील अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, परिचारिका, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी बाळासाहेब घुगे, विस्तार अधिकारी अविनाश बेलोकर तसेच जिल्हा महिला रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## मोर्णा नदी दुथडी भरून वाहली

**अकोला :** शनिवारी सायंकाळी शहरासह जिल्ह्यातील ग्रामीण भागात वीजांच्या कडकडाटासह जोरदार पाऊस झाला. या पावसामुळे रविवारी सकाळी अकोला शहराच्या मध्यभागातून वाहणारी मोर्णा नदी दुथडी भरून वाहताना दिसली. नदीपात्रात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक झाल्याने नदीचे मनोहारी रूप पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली.



# विद्या भारतीची प्रांत बैठक उत्साहात संपन्न



प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** विद्या भारती विदर्भ प्रांताची प्रांत बैठक आज अकोला येथील श्री. सरस्वती इंग्लिश मीडियम स्कूल, केशव नगर येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. उद्घाटन समारंभ प्रसंगी मंचावर प्रांत अध्यक्ष सचिन जोशी, प्रांत मंत्री रोशन आगरकर, पूर्व अध्यक्ष रमेश धारकर, पूर्व अध्यक्ष डॉ.राम देशमुख, अकोला जिल्हा अध्यक्ष विठ्ठल खारोडे यांच्या उपस्थितीत प्रांतातील जिल्ह्यामध्ये संघटनात्मक, शैक्षणिक व आगामी उपक्रमांबाबत सविस्तर माहिती घेण्यात आली.

बैठकीस प्रांत कार्यकारिणी सदस्य, आधारभूत विषय प्रमुख, विविध आयाम प्रमुख तसेच सर्व जिल्ह्यांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मंत्री, सहमंत्री आणि नागपूर महानगर कार्यकारिणीचे पदाधिकारी उपस्थित होते.

प्रत्येक जिल्ह्यात २० जुलै ते २० ऑगस्ट शाळाशाळांशी संपर्क अभियान योजना, २५ सप्टेंबर रोजी वंदे मातरम् गायनाचे कार्यक्रमाचे आयोजन, रविदास ६५० वे प्रकाश वर्षा निमित्त विविध कार्यक्रम, अखिल भारतीय घोष शिबिराची पूर्वतयारी, विज्ञान मेळाव्याचे आयोजन करणे, वैदिक गणित स्पर्धाचे आयोजन करणे, सोबतच वार्षिक शैक्षिक उपक्रम, विशेष कार्यक्रमांचा आढावा, संलग्न शाळांची माहिती, जिल्हा व महानगर कार्याची स्थिती तसेच आगामी संस्कृती ज्ञान परीक्षा यशस्वी करण्यासाठी आवश्यक नियोजन व लक्ष्य निश्चिती यावर सखोल चर्चा करण्यात आली.

बैठकीत आगामी काळातील संघटन बळकटी, शैक्षणिक गुणवत्ता वृद्धी आणि विविध उपक्रम प्रभावीपणे राबविण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

## न्यू इंग्लिश हायस्कूल सॅलरी अर्नर्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची वार्षिक आमसभा उत्साहात



प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** न्यू इंग्लिश हायस्कूल सॅलरी अर्नर्स को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीची वार्षिक आमसभा उत्साहात झाली. कार्यक्रमाचे अध्यक्षीय स्थान संस्थेचे अध्यक्ष प्रा. श्रीकांत रत्नपारखी यांनी भुषवले तर मार्गदर्शक म्हणून प्राचार्य माधव मुनशी, अनिल देवीकर, मेधा देशपांडे तसेच खजिनदार तुषार उज्जनकर यांनी मंचावर होते. कार्यक्रमाचे संचालन संचालक कु.अलका मुंढे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक खजिनदार श्री उज्जनकर सर यांनी केले. अध्यक्षीय भाषणात प्रा. श्रीकांत रत्नपारखी यांनी संस्थेची वाटचाल ,आर्थिक ताळमेळ तसेच व्यवस्थापन मंडळाचे कामकाज पारदर्शकपणे सुरू असून आर्थिक शिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. सर्व संचालक मंडळाचे सहकार्य हिच आपली ताकद असल्याचे त्यांनी सांगितले. प्राचार्य माधव मुनशी, अनिल देवीकर, श्रीमती मेधा देशपांडे यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

# नेत्र व आरोग्य तपासणी शिबिराचा 415 रुग्णांना लाभ



प्रतिनिधी २८ जून

**अकोट :** शहरातील रोटरी व्हिजन, दम्मानी नेत्र रुग्णालय, अकोला, रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डन, मुंबई तर्फे बिलबिले मंगल कार्यालयात मोफत नेत्र व आरोग्य तपासणी तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर झाले.या शिबिरामध्ये दम्मानी नेत्र रुग्णालय, अकोला येथील तज्ज्ञ डॉ.चमूद्वारे २१५ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. मोतीबिंदूग्रस्त रुग्णांची तपासणी करून शस्त्रक्रियेसाठी ९५ पात्र रुग्णांची निवड करण्यात आली. महिलांसाठी आयोजित स्त्रीरोग तपासणी शिबिरात डॉ. शीतल गावंडे, डॉ. श्वेता येऊल, वृषाली राठोड यांनी मार्गदर्शन करत ७५ स्त्री रुग्णांची तपासणी केली. तसेच डॉ. निखिल धांडे व डॉ. ऋतिकेश येउल यांनी रक्तदाब, रक्तातील साखर, HbA1c, वजन, उंची आदी आरोग्य तपासण्या करून १३५ नागरिकांना आरोग्य विषयक मार्गदर्शन केले. शिबिरास नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. कार्यक्रमास नगर परिषद अकोटचे उपाध्यक्ष प्रथमेश बोरोडे, नगरसेविका शीतल मंगेश पटके, नगरसेवक अचल बलसरे व सचिन जनगरे, अजय अडोकार विनोद कडू यांची प्रमुख उपस्थिती लाभली. शिबिराच्या यशस्वी संजय बोरोडे, अभिजित अग्रवाल व सचिन मारू यांनी परिश्रम घेतले. रोटरी क्लब अकोट व्हिजनचे आनंद भोरे,संदीप भुस्कट, नंदकिशोर शेगोकार, अतुल मालाणी तसेच रोटरी व्हिजन अनंत काळे, मंगेश चिखले, शिरीष वंजारा, नितीन शेगोकार,विजय नवले, अतुल भिरडे, सचिन भुस्कट ,संदीप बोबडे शेतकरी समूहाचे अनिल खलोकर, अजिंक्य नाथे, दर्शन ठाकूर, वैभव काळे, अतुल निमकर, कैलास गुलाहे यांनी यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# विजेच्या समस्ये बद्दल सनातन संस्कृती महासंघ आक्रमक

प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** शनिवारी सायंकाळी शहराला पावसाने झोडपले. जुने शहर भागात वीजेचा लपंडाव सुरू होता. सकाळी देखील एक तास वीज नव्हती. रात्री आठच्या दरम्यान वीज पुरवठा पुन्हा खंडित झाला. जवळपास एका तासा नंतर कंट्रोल रूमला फोन केला असता शहराच्या काही भागात आपत्कालीन भारनियमन राबविण्यात येत असल्याचे सांगण्यात आले. शहर विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी जी-१, २, आणि जी- ३ फिडर वर आपत्कालीन भारनियमन राबविण्यात येत आहे, असे सांगितले. रात्री १० वाजता वीज पुरवठा सुरू झाला. थोडा सुटकेचा श्वास घेतला असता साडेदहा वाजता पुन्हा वीज पुरवठा खंडित झाला. जो रात्री साडेबारा वाजता सुरू झाला. रविवारी सकाळी देखील वीजेचा लपंडावा सुरूच होता. जास्त वीज हानी असलेल्या फिडर वर भारनियमन राबविण्यात येते. हा त्या फिडर वरील प्रामाणिक वीज ग्राहकांवर अन्याय आहे. वीज हानी तसेच वीज चोरी यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महावितरण कंपनीची आहे. त्यात कंपनी कमी पडते आहे. याला ग्राहक दोषी नाही. त्यामुळे विशिष्ट फिडर वरच भारनियमन राबविण्यात येवू नये. महावितरण कंपनीचा कारभार ढेपाळला आहे. वीज ग्राहकांना छापील बीलं मिळत नाही. त्यामुळे अनेक ग्राहक प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंट च्या लाभा पासून वंचित राहतात. महानगराच्या हद्द वाढीमुळे अनेक वीज ग्राहकांचे तक्रार निवारण केंद्र बदलण्यात आले आहेत. आपला ग्राहक क्रमांक नेमका कुठल्या तक्रार निवारण केंद्रात येतो याची बऱ्याच ग्राहकांना कल्पना नाही. त्यामुळे काही समस्या निर्माण झाल्यास ग्राहकांना केंद्रावर हेलपाटे मारावे लागतात.

# विविध उपक्रमाने नशामुक्त भारत सप्ताहाचा समारोप

प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** आंतरराष्ट्रीय मादक पदार्थ गैरवापर आणि अवैध तस्करी विरोधीदिन निमित्त सामाजिक न्याय विभागद्वारे नशामुक्त भारत अभियान अंतर्गत नशा मुक्त सप्ताहचे आयोजन करण्याचे आवाहन करण्यात आले होते त्या अनुषंगाने जिल्हा समाज कल्याण विभाग जि.प अकोला व युवा व्यसनमुक्ती जन समिती अकोला ता.जी अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने सदर व्यसनमुक्ती सप्ताह राबविण्यात आला

अंमली पदार्थाच्या सेवनामुळे होणारे दुष्परिणामाचे जनजागृती व प्रबोधनात्मक कार्यक्रम राबविले त्यामध्ये पथनाट्य,चर्चासत्र, विद्यार्थी परिसंवाद,गीत गायन,योगा दिवस,नशामुक्त भारतासाठी स्वाक्षरी अभियान,व्यसनमुक्ती सामूहिक शपथ, विद्यार्थी गौरव सोहळा आधी कार्यक्रम सदर सप्ताह मध्ये राबविण्यात आले



आर.एल.टी महाविद्यालयात झालेल्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी समाज कल्याण अधिकारी डॉ.तुषार जाधव होते तर प्रमुख मार्गदर्शक जिल्हा पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, प्रमुख उपस्थिती प्राचार्य डॉ. राजेश चंद्रवंशी, संस्था अध्यक्ष अमरदीप सदांशिव, कमलजीत कौर ही उपस्थित होते. दीप प्रज्वलित करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली त्यानंतर अर्चित चांडक सर यांनी अंमली पदार्थ याबद्दल मार्गदर्शन केले व स्पर्धात्मक विविध क्षेत्रांमध्ये यश संपादित केलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला त्यानंतर व्यसनमुक्तीची शपथ अमरदीप सदांशिव यांनी उपस्थितांना दिली,पथनाट्य व अकोला कलावंत समितीच्या वतीने देशभक्तीपर गीत सादर करण्यात आले..

यावेळी समाज कल्याण विभाग चे संतोष आडे,संस्था कोषाध्यक्ष राहुल तायडे, सचिव ऋषिकेश झीने,प्रवीण वाहूरवाघ,निलेश खडसान, सचिन शिरसाठ, बलवंत गोपनारायण, व्यसनमुक्ती पुरस्कार प्राप्त डॉ.धनंजय नालट,मनीष खर्चे, पंकज खंडारे, राहुल पावनमारे, विश्वदीप सदांशिव, प्रकाश बागडे उपस्थित होते कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था अध्यक्ष अमरदीप सदांशिव यांनी केले तर सूत्रसंचालन विकास पल्हाडे यांनी केले.

## पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यावर आले दगड, काडीकचरा!

**अकोला :** शनिवारी सायंकाळी आलेल्या जोरदार पावसामुळे मुख्य रस्त्याच्या बाजूचे नाले ओसंडून वाहत नालीतील घाण पाणी, काडीकचरा, दगड रस्त्यावर आले आहेत. रस्त्यावरील पाण्यामुळे हे दिसत नसल्यामुळे अनेक वाहनधारक या दगडावरून गेल्याने त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटून अपघात होत आहेत. तसेच वाहने घसरत असल्याने वाहनधारक जखमी होत आहे. याचा सर्वाधिक त्रास मुली, महिलांना व वृद्ध नागरिकांना सहन करावा लागत आहे. हे चित्र शनिवारी लहान उमरी ते रतनलाल प्लॉट मार्गावर दिसून आले. मुसळधार पावसामुळे शहर स्वच्छतेची वाट लागलेली दिसून आली, महापालिका यंत्रणा अजूनही गंभीर नाही, असे दिसते.

## टीईटी परीक्षा प्रश्नपत्रिका गळती प्रकरणाची चौकशी करून दोषींवर कारवाई करा - जावेद जकारिया

प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवारचे प्रदेश संघटन सचिव जावेद ज़करिया यांनी महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (TET) २०२६ च्या कथित प्रश्नपत्रिका गळती प्रकरणाचा तीव्र निषेध केला असून ही घटना लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी झालेला गंभीर अन्याय असल्याचे म्हटले आहे.

ते म्हणाले की, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेला परीक्षा स्थगित करण्याचा निर्णय घ्यावा लागला, यावरून परीक्षेच्या गोपनीयतेचा भंग झाल्याचे स्पष्ट होते. प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना मानसिक, आर्थिक आणि शैक्षणिक नुकसान सहन करावे लागत असून, यासाठी जबाबदार असलेल्या सर्व दोषींवर कठोर कारवाई झाली पाहिजे. जावेद ज़करिया यांनी राज्य सरकारकडे संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तसेच प्रश्नपत्रिका गळतीमध्ये सहभागी असलेल्या सर्व आरोपी, अधिकारी व संबंधित व्यक्तींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी परीक्षा प्रणाली अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम करण्यात यावी, अशीही त्यांनी मागणी केली. ते पुढे म्हणाले की, सरकारने नवीन परीक्षा तारीख लवकरात लवकर जाहीर करून विद्यार्थ्यांची चिंता दूर करावी आणि भविष्यात कोणत्याही स्पर्धा परीक्षेत अशा प्रकारची निष्काळजीपणा किंवा भ्रष्टाचार होणार नाही, याची खात्री करावी असे जावेद ज़करिया यांनी म्हटले आहे.

# वारा व पावसामुळे तीन एकर केळी जमीनदोस्त

## शेतकऱ्याचे लाखो रुपयाचे नुकसान


प्रतिनिधी २८ जून

**हिवरखेड :** २७ रोजी सायंकाळी वारा व पावसामुळे अभिजीत गावंडे या शेतकऱ्याच्या शेतातील केळीचे पीक जमीनदोस्त झाले असून तोंडचा घास निसर्गाने पडून नेला.

तळेगाव खुर्द शेत शिवारात अभिजीत गावंडे यांचे शेत सर्वे नंबर १७८, मध्ये शेत असून त्यांनी तीन एकर क्षेत्रफळावर केळी या पिकाची लागवड केली सध्या स्थिती सध्या स्थितीत केळीचे भाव २००० रुपये असून अभिजीत गावंडे यांची केळी कापणीसाठी आली असता २७ जून रोजी सायंकाळ दरम्यान झालेल्या वारा व पावसामुळे त्यांची संपूर्ण केळी जमीनदोस्त झाली असून निसर्गाने या शेतकऱ्याच्या तोंडचा घास पडून नेला. अभिजीत गावंडे यांनी सदर पिकाचे गेल्या आठ ते दहा महिन्या पासून संगोपन करून लाखो रुपये खर्च लावला तीन एकर क्षेत्रफळातील केळीचे केळीचे जवळपास आठ ते दहा लाख रुपये उत्पन्न निघते मात्र सदर केळीची घटना आली असतानाच निसर्गामुळे त्यांचे मोठे नुकसान झाले असून शासनाकडून तात्काळ पंचनामा करून या शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी अभिजीत गावंडे यांनी केली आहे.



हिवरखेड आणि परिसरात शनिवारी पावसाचा कहर पाहायला मिळाला. सोसाट्याचा वारा वाहत असल्यामुळे घरांवरील टिनपत्रे उडाली. तसेच लोकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले दिसले. नागरिकांची तारांबळ उडाली. या पावसाळ्यात कालचा पाऊस अतिशय दमदार होता. पिके देखील उद्ध्वस्त झाले. शेतातील केळी पिकाची हानी झाली. केळी अक्षरशः झोपली. यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसान सहन करावे लागणार आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
रविवार, दि. २८ जून २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# ‘दोन संजय’ अन् शिवसेने-समोर नव्या नेतृत्वाचे आव्हान

## यवतमाळच्या राजकारणात विकास की वर्चस्वाची लढाई ?







**राजकीय विश्लेशन**

**राहुल वासनिक, यवतमाळ**

प्रतिनिधी २८ जून

**यवतमाळ** : यवतमाळच्या राजकारणात सध्या पक्षांतरापेक्षा त्यामागील राजकीय परिणामांची चर्चा अधिक रंगत आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेतील सहा खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी यवतमाळपासून जनसंवादाची सुरुवात केली. या सभेला झालेली मोठी गर्दी पाहता, शिवसेनेचा पारंपरिक मतदार आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांचा आधार अद्याप कायम असल्याचे चित्र दिसून आले. मात्र, ही भावनिक ताकद आगामी निवडणुकांमध्ये मतांमध्ये रूपांतरित करण्यासाठी शिवसेनेला नव्या नेतृत्वाची उभारणी करावी लागणार आहे.

यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख यांनी शिंदे गटात प्रवेश करताना मतदारसंघाच्या विकासासाठी सत्तेशी जोडले जाणे आवश्यक असल्याचे सांगितले. मात्र, त्यांनी उल्लेख केलेल्या वर्धा–नांदेड रेल्वे प्रकल्पाला यापूर्वीच मंजुरी आणि अर्थसंकल्पीय निधी मिळालेला आहे. त्यामुळे पक्षांतरानंतर मतदारसंघाला नेमका कोणता नवा विकास मिळणार, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. सत्तेतील सहभागामुळे नवीन उद्योग, सिंचन, रस्ते, रोजगार किंवा अन्य महत्त्वाचे प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यात यश आले, तरच त्यांच्या निर्णयाला जनमान्यता मिळू शकते.

दुसरीकडे, जिल्ह्यात पालकमंत्री संजय राठोड यांचे दारव्हा-दिग्रस परिसरातील मजबूत राजकीय वर्चस्व आधीपासूनच आहे. आता त्याच परिसरातील खासदार संजय देशमुख हेही सत्ताधारी गटात आल्याने ‘दोन संजय’चे राजकारण चर्चेचा विषय ठरत आहे. दोघांमध्ये समन्वय राहून विकासाला गती मिळते की स्थानिक नेतृत्वाच्या स्पर्धेत नवे समीकरण तयार होते, हे आगामी काळात स्पष्ट होणार आहे.

२०२९ च्या लोकसभा निवडणुकीचा विचार करता, सध्याची समीकरणे कायम राहतीलच, याची खात्री नाही. महायुतीत जागावाटपाचा प्रश्न निर्माण झाल्यास भाजप या मतदारसंघावर दावा करू शकतो. अशी परिस्थिती निर्माण झाल्यास संजय देशमुख यांच्यासमोर उमेदवारीचे नवे आव्हान उभे राहू शकते. त्यामुळे पुढील काही वर्षांत विकासकामांसह स्वतःचे राजकीय स्थान अधिक भक्कम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.

दरम्यान, उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेसाठीही ही संधी आणि आव्हान दोन्ही आहे. जिल्ह्यातील संघटना नव्याने उभी करणे, गावपातळीवर सक्षम नेतृत्व तयार करणे आणि स्थानिक प्रश्नांवर सातत्याने जनतेशी संपर्क ठेवणे, या बाबींवर पक्षाला भर द्यावा लागणार आहे. केवळ सभांमधील गर्दी पुरेशी ठरणार नाही; तर पर्यायी नेतृत्व उभे करण्याची क्षमता दाखवावी लागेल. यवतमाळच्या राजकारणात आता लढाई केवळ सत्ताधारी वविरोधकांमध्ये राहिलेली नाही. ती विकासाच्या दाव्यांची, नेतृत्वाच्या विश्वासार्हतेची आणि भविष्यातील राजकीय वर्चस्वाची आहे. त्यामुळे आगामी काळात ‘दोन संजय’ विरुद्ध नव्या नेतृत्वाची उभारणी हेच जिल्ह्याच्या राजकारणाचे प्रमुख सूत्र ठरण्याची चिन्हे आहे.

# आक्षेपार्ह व्हिडिओविरोधात निवेदन; चौकशी व कारवाईची मागणी

प्रतिनिधी २८ जून



**पुसद** : सोशल मीडियावर प्रसारित झालेल्या एका कथित आक्षेपार्ह व्हिडिओच्या पार्श्वभूमीवर पुसद शहरातील मुस्लिम समाजाने संताप व्यक्त करत संबंधित व्यक्तीविरुद्ध कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे. प्रेषित हजरत मुहम्मद आणि हजरत आयशा (र.अ.) यांच्याबाबत कथित अवमानकारक वक्तव्ये केल्याचा आरोप करत नाझीया इलाही खान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

यासंदर्भात पुसद शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सेवानंद वानखेडे यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवरील एका पॉडकास्ट व इन्स्टाग्रामवरील मुलाखतीत इस्लाम धर्माशी संबंधित श्रद्धास्थानांविषयी आक्षेपार्ह वक्तव्ये करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे.

मुस्लिम समाजाच्या प्रतिनिधींनी दिलेल्या निवेदनानुसार, संबंधित व्हिडिओमुळे धार्मिक भावना दुखावल्या गेल्या असून समाजामध्ये असंतोषाचे वातावरण निर्माण झाले आहे. तसेच, अशा प्रकारच्या सामग्रीमुळे सामाजिक सलोखा आणि कायदा-सुव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

निवेदनाद्वारे या प्रकरणाची सखोल चौकशी करून भारतीय न्याय संहिता तसेच माहिती तंत्रज्ञान अधिनियमांतर्गत लागू असलेल्या कलमांनुसार संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. भविष्यात अशा प्रकारचे व्हिडिओ प्रसारित होऊ नयेत, यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करून संबंधित सामग्री हटविण्याची कार्यवाही करण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

या मागणीला पाठिंबा देण्यासाठी अनेक नागरिकांनी सह्या केल्या. यावेळी सैय्यद इश्तियाक, सैय्यद जहीरोद्दीन, फिरोज खान, आकिब रिझवी, नवाज अली, अब्दुल सिद्दीक, फैजान अहमद, मोहम्मद सिद्दीक, सैय्यद हाशिर, हसनैन खान, शेख जुबेर, सैय्यद रहेबर, शाहरुख खान, शेख सद्दाम, अब्दुल अतीक, मोहम्मद अशफाक, सैय्यद शोएब यांच्यासह अनेक नागरिक उपस्थित होते.

पुसद मुस्लिम समाजाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित व्यक्तीविरुद्ध कठोर व तात्काळ कायदेशीर कारवाई करण्याची मागणी पोलीस प्रशासनाकडे केली आहे.

# पारवा–आदिलाबाद महामार्गावर झाड कोसळले

## पारवा पोलिसांच्या तत्परतेने वाहतूक सुरळीत

प्रतिनिधी २८ जून



**घाटंजी** : पारवा-आदिलाबाद राज्य महामार्गावरील रामनगर गावाजवळ शुक्रवारी सकाळी साडेसातच्या सुमारास महाकाय झाड रस्त्यावर कोसळल्याने काही काळ वाहतूक ठप्प झाली होती. पारवा पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत स्थानिकांच्या मदतीने झाड हटवून वाहतूक सुरळीत केली.

झाड कोसळल्यामुळे महामार्गाच्या दोन्ही बाजूंना वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. अनेक प्रवासी व नागरिकांना काही काळ अडचणींचा सामना करावा लागला. घटनेची माहिती मिळताच पारवा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक हेमंत चौधरी यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली.

स्थानिक मजुरांच्या मदतीने झाडाचे तुकडे करून ते रस्त्याच्या कडेला हटविण्यात आले. त्यामुळे अल्पावधीतच वाहतूक पूर्ववत झाली. या कामात पोलीस उपनिरीक्षक गोपाळ राठोड, पोलिस शिपाई राहुल राठोड तसेच इतर कर्मचाऱ्यांनीही सहभाग घेतला.

पारवा पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेबद्दल रामनगर परिसरातील नागरिक, वाहनचालक आणि प्रवाशांनी समाधान व्यक्त करीत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

# पंचवटीत वृक्षारोपण; ‘एक व्यक्ती-एक वृक्ष’ संकल्प



प्रतिनिधी २८ जून

**उमरखेड** : पर्यावरण संवर्धन आणि हरित परिसर निर्मितीचा संदेश देण्यासाठी पंचवटी परिसरात शनिवारी वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी वड, पिंपळ, आवळा, बेल आणि उंबर या पर्यावरणपूरक व सावली देणाऱ्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

आंबोना मॉर्निंग वॉक ग्रुप आणि पर्यावरण मित्र वृक्ष सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वृक्षारोपण उपक्रमात सामाजिक कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

यावेळी समितीचे ओमभाऊ पीपलवा, जमीर खतीब, ॲड. प्रा. विजय गुजरे, अशोक गांजेगावकर, गजानन चौधरी, प्रमोद वाळूक्कर, निखिल साकळे, गोविंद कवटीकवार, अमोल राठोड, गणेश कान्नव, दीपक शिवाल, खंडेलवाल साहेब, दिनेशभाऊ तेला, संजुभाऊ मुडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी ॲड. प्रा. विजय गुजरे यांनी प्रत्येक नागरिकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहन केले. वृक्षारोपणामुळे पर्यावरणाचा समतोल राखण्यास, प्रदूषण कमी करण्यास आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ व निरोगी वातावरण निर्माण करण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी ‘एक व्यक्ती – एक वृक्ष’ हा संकल्प करून पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय योगदान देण्याचा निर्धार व्यक्त केला.

# लोककलावंत माणिकराव ढोरे यांचे निधन

## विदर्भाच्या लोककला क्षेत्रावर शोककळा

प्रतिनिधी २८ जून

**यवतमाळ** : आपल्या बहुआयामी कलागुणांनी संपूर्ण विदर्भासह महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणारे ज्येष्ठ लोककलावंत, शाहीर, नाट्यकलावंत, गायक आणि मिमिक्री आर्टिस्ट माणिकराव ढोरे यांचे रविवारी (दि. २८) सकाळी ६ वाजता नेर येथील नवजीवन वृद्धाश्रमात दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनामुळे लोककला क्षेत्रात हळहळ व्यक्त होत असून, कला रसिकांमध्ये शोककळा पसरली आहे.



माणिकराव ढोरे यांनी आपल्या नैसर्गिक कलागुणांच्या बळावर अनेक वर्षे लोककला, शाहिरी, नाट्य आणि गायन क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. त्यांच्या प्रभावी सादरीकरणामुळे त्यांनी विदर्भासह महाराष्ट्रातील रसिकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले होते. विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये त्यांनी आपल्या कलाविष्कारातून प्रेक्षकांची मने जिंकली होती.

त्यांच्या निधनाने लोककला क्षेत्रातील एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले असून, अनेकांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

माणिकराव ढोरे यांच्यावर सोमवारी (दि. २९ जून) सकाळी १० वाजता नेर येथील नवजीवन वृद्धाश्रम येथून अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे.

# ॲड.आशिष देशमुख यांचा श्री शिवाजी शिक्षण संस्थेकडून गौरव

प्रतिनिधी २८ जून



**पुसद** : बार काऊन्सिल ऑफ महाराष्ट्र अँड गोवा यांच्या कार्यकारिणीवर सलग तिसऱ्यांदा सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल ॲड. आशिष पंजाबराव देशमुख व त्यांच्या पत्नी अनुप्रिताताई देशमुख यांचा श्री शिवाजी शिक्षण संस्था, पुसदच्या वतीने भव्य सत्कार करण्यात आला. हा कौटुंबिक सत्कार सोहळा २५ जून रोजी श्री शिवाजी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या देवराव पाटील चोंढीकर सभागृहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असोसिएट डीन तथा संस्थेचे संचालक डॉ. विजयराव माने होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर, उपाध्यक्ष सुभाषराव देशमुख, सचिव अश्विनीताई पाटील चोंढीकर, संचालक काशीराव पाटील, साहेबराव पाटील व ॲड. अर्चनाताई माने यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील चोंढीकर यांनी प्रास्ताविकात ॲड. देशमुख यांच्या यशाचा संस्थेला अभिमान असल्याचे सांगितले.

मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन ॲड. आशिष देशमुख व अनुप्रिताताई देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बोलताना ॲड. आशिष देशमुख म्हणाले, "हा माझा एकट्याचा सत्कार नसून संस्थेतील प्रत्येक व्यक्तीचा सन्मान आहे. माझ्या जडणघडणीत व यशामध्ये या संस्थेचे मोलाचे योगदान आहे. बार कौन्सिलची निवडणूक अत्यंत आव्हानात्मक होती. मात्र, सर्वांच्या प्रेम व पाठबळामुळे हे यश मिळविणे शक्य झाले."

अध्यक्षीय समारोपात डॉ. विजयराव माने यांनी आशिष देशमुख यांच्या यशाचा गौरव करत, महाराष्ट्र व गोवा बार कौन्सिलवर संस्थेचा प्रतिनिधी निवडून येणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगितले. त्यांनी देशमुख यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. गजानन जाधव यांनी केले. यावेळी संस्थेच्या विविध शाखांतील प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 36 वर्षे सेवा करुनही सेवानिवृत्त लाभांपासून वंचित

प्रतिनिधी २८ जून




**यवतमाळ** : यवतमाळ नगर परिषदेत ३६ वर्षे सफाई कामगार म्हणून सेवा बजावलेल्या मनोहर रुस्तम देशभ्रतार यांना सेवानिवृत्तीनंतरही हक्काचे आर्थिक लाभ न मिळाल्याने त्यांनी नगर परिषदेसमोर साखळी उपोषण सुरू केले आहे.

या आंदोलनाला बहुजन मुक्ती पार्टीचे यवतमाळ-वाशीम लोकसभा अध्यक्ष बिमोद मुधाने यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला.

मनोहर देशभ्रतार हे १४ जून १९८९ रोजी नगर परिषदेत रुजू झाले होते. जून २०२५ मध्ये ते सेवानिवृत्त झाले. मात्र, १६ महिने उलटूनही त्यांना निवृत्ती वेतन, उपदान, जीपीएफ, जीआयएस, कम्युटेशन आणि शिल्लक रजेचे वेतन मिळाले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यावेळी बिमोद मुधाने यांनी नगर परिषद प्रशासनावर टीका करत, ३६ वर्षे सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्याला हक्काच्या पैशांसाठी उपोषणाला बसावे लागणे ही दुर्दैवी बाब असल्याचे सांगितले. तसेच संबंधित लाभ तातडीने देण्याची मागणी केली.

मागण्या पूर्ण न झाल्यास बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

# वसंतराव नाईक जयंतीनिमित्त पुसद–गहुली कृषीदिंडी

## युवक-शेतकऱ्यांना सहभागी होण्याचे आवाहन

प्रतिनिधी २८ जून



**पुसद** : हरितक्रांतीचे प्रणेते माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त पुसद ते गहुली दरम्यान भव्य दुचाकी कृषीदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. वसंतराव नाईक स्मृती प्रतिष्ठानच्या मार्गदर्शनाखाली वसंतराव नाईक जयंती उत्सव समितीने या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

कृषीदिंडीत युवक व शेतकऱ्यांचा मोठ्या संख्येने सहभाग व्हावा, यासाठी माजी मंत्री मनोहरराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली नाईक बंगल्यावर बैठक झाली. या वेळी विविध तालुक्यांतील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

मनोहरराव नाईक यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना, वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषीदिंडीत युवक व शेतकऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन भूमिपुत्राला अभिवादन करणारा हा सोहळा यशस्वी करावा, असे आवाहन केले.

या वेळी इंद्रनील नाईक तसेच पुसद नगर परिषदेच्या नगराध्यक्षा मोहिनी नाईक यांनीही उपस्थितांना संबोधित केले.

कृषीदिंडीत मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी केले.

पुसद येथील वसंतराव नाईक चौकातून निघणारी ही कृषीदिंडी गहुली येथील समाधीस्थळी पोहोचून भूमिपुत्र अभिवादन सोहळ्यात सहभागी होणार असल्याची माहिती मनोहरराव नाईक यांनी दिली.

बैठकीस पुसद, महागाव व उमरखेड तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि युवा मंडळी उपस्थित होती.

सिटी न्यूज अमरावती
रविवार, दि.२८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे राजर्षी छत्रपती शाहू महाराज जयंती साजरी व मासिक सभेचे आयोजन

**दर्यापूर:** स्थानिक आदर्श हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, दर्यापूर येथे दि. २६ जून २०२६ रोजी समाजसुधारक, शिक्षणप्रेमी व लोककल्याणकारी राज्यकर्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम तसेच शाळापूर्व तयारीच्या पार्श्वभूमीवर शिक्षकांची मासिक सभा उत्साहात संपन्न झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक मा. श्री. एम. आर. देशमुख सर उपस्थित होते. प्रमुख अतिथी म्हणून उपमुख्याध्यापक मा. श्री. एस. बी. ठाकरे सर, शिक्षक प्रतिनिधी श्री. अनिलभाऊ भारसाकळे सर दुपार सत्राचे प्रभारी श्री. पी. एम. काळे सर, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्रभारी श्री. पी. डी. गावंडे सर तसेच शिक्षकेत्तर प्रतिनिधी श्री. प्रदीपभाऊ भारसाकळे उपस्थित होते. यावेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. त्यांच्या शिक्षणविषयक धोरणांचा, सामाजिक समतेसाठी केलेल्या कार्याचा तसेच बहुजन समाजाच्या उन्नतीसाठी दिलेल्या योगदानाचा आढावा घेण्यात आला.

# आ. रवी राणा यांच्या पाठपुराव्याला यश; ५ रेल्वे उड्डाणपुलांना केंद्राची मंजुरी

### ◆ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्याने अमरावतीच्या विकासाला नवी गती

प्रतिनिधी २८ जून

**अमरावती:** अमरावती शहरातील वाहतूक कोंडी, रेल्वे फाटकांवरील वारंवार होणारी अडचण आणि नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेऊन आमदार रवी राणा यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केलेल्या महत्त्वपूर्ण मागणीला अखेर यश आले आहे. केंद्र शासनाने अमरावती व बडनेरा परिसरातील ५ महत्त्वाच्या रेल्वे उड्डाणपूल (ईं) व ॅईं-म्ल्स्-इईं प्रकल्पांना मंजुरी दिली आहे. या मंजुरीमुळे अमरावती शहराच्या पायाभूत सुविधांच्या विकासात ऐतिहासिक भर पडणार असून नागरिकांना वाहतुकीत मोठा दिलासा मिळणार आहे.

या प्रकल्पांना मंजुरी मिळवून देण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विशेष सहकार्य केले असून त्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे आणि आमदार रवी राणा यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे केंद्र शासनाकडून या कामांना हिरवा कंदील मिळाला आहे.

केंद्र शासनाने मंजूर केलेल्या प्रस्तावांनुसार अमरावती व बडनेरा परिसरात खालील पाच ठिकाणी उड्डाणपूल उभारण्यात येणार आहेत. यामध्ये –पार्वती नगर, अमरावती पार्वती नगर येथील शिवलीला मंगल कार्यालय परिसराला राज्य महामार्ग क्रमांक २०० शी जोडणाऱ्या मार्गावर रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. हा पूल अमरावती-नरखेड रेल्वे मार्गावरील वाहतुकीसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

साई नगर, अमरावती साई नगर ते अकोली रोड या मार्गाला जोडणारा रेल्वे उड्डाणपूल मंजूर करण्यात आला आहे. या पुलामुळे परिसरातील नागरिकांची दैनंदिन वाहतूक अधिक सुलभ होणार आहे. व बडनेरा शहराला अंतर्गत बायपास रोडशी जोडणारा महत्त्वपूर्ण रेल्वे उड्डाणपूल उभारण्यात येणार आहे. बडनेरा-अमरावती दरम्यान वाढत्या वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी हा पूल अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तसेच शशी नगर – गोपाल नगर मार्गबडनेरा-अमरावती रेल्वे मार्गावर शशी नगर ते गोपाल नगर जोडणारी ँईं-म्ल्स्-इईं मंजूर करण्यात आला आहे. यामुळे वाहनांसोबतच पादचाऱ्यांनाही सुरक्षित मार्ग उपलब्ध होणार आहे.

त्याचप्रमाणे बडनेरा रोड – गोपाल नगर मार्ग बडनेरा रोड ते गोपाल नगर जोडणाऱ्या मार्गावर आणखी एक ॅईं-म्ल्स्-इईं उभारण्यात येणार असून यामुळे परिसरातील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे.

यामुळे अमरावती आणि बडनेरा परिसरातील अनेक रेल्वे फाटकांवर दिवसातून अनेक वेळा वाहतूक खोळंबते. रेल्वे गाड्यांच्या वाढत्या संख्येमुळे नागरिकांना तासन्तास प्रतीक्षा करावी लागते. रुग्णवाहिका, शालेय वाहने, शेतकरी आणि व्यावसायिक यांनाही याचा मोठा फटका बसतो. प्रस्तावित उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतर रेल्वे फाटकांवरील प्रतीक्षा संपुष्टात येऊन वाहतुकीचा वेग वाढणार आहे. तसेच इंधनाची बचत, वेळेची बचत आणि अपघातांमध्ये घट होण्यास मदत होणार आहे.

अमरावती शहराचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहराला आधुनिक वाहतूक सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक होते. याच उद्देशाने आमदार रवी राणा यांनी रेल्वे मंत्रालय, केंद्र शासन तसेच राज्य शासनाच्या विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या प्रयत्नांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे मोलाचे सहकार्य लाभल्यामुळे हे प्रकल्प मंजुरीच्या अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचू शकले.

या मंजुरीबाबत आनंद व्यक्त करताना आमदार रवि राणा म्हणाले की, ठअमरावती शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी आम्ही सातत्याने प्रयत्न करीत आहोत. केंद्र शासनाने मंजुरी दिलेल्या या पाच उड्डाणपुलांमुळे शहराच्या वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल होईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सहकार्यामुळे हे काम शक्य झाले असून भविष्यातही अमरावतीच्या विकासासाठी मोठे प्रकल्प आणण्याचा प्रयत्न राहील.

## पोलिओमुक्त अमरावतीसाठी प्रत्येक पालकाने जबाबदारी पार पाडावी - महापौर श्रीचंद तेजवानी

प्रतिनिधी २८ जून



**अमरावती:** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेअंतर्गत रविवार, दि. २८ जून रोजी अमरावती शहरात ० ते ५ वर्षे वयोगटातील ६७ हजारांहून अधिक बालकांना पोलिओ प्रतिबंधक लसीचे दोन थेंब पाजण्यात येणार आहेत. या मोहिमेत शहरातील प्रत्येक पालकाने सक्रिय सहभाग घेऊन आपल्या बालकाला जवळच्या लसीकरण केंद्रावर नेऊन पोलिओचे दोन थेंब अवश्य पाजावेत, असे आवाहन अमरावतीचे माननीय महापौर श्रीचंद तेजवानी यांनी केले आहे.

महापौर श्रीचंद तेजवानी म्हणाले की, ठपोलिओमुक्त भारताचे यश कायम राखणे ही आपली सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नियमित लसीकरण झाले असले तरी राष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिमेअंतर्गत दिला जाणारा डोस प्रत्येक बालकासाठी अत्यंत आवश्यक आहे. शहरातील एकही बालक लसीकरणापासून वंचित राहू नये, यासाठी प्रत्येक पालकाने पुढाकार घ्यावा.

महानगरपालिकेने या मोहिमेसाठी शहरात ३३७ लसीकरण बूथ, १९ मोबाईल पथके आणि २९ ट्रान्झिट पथके कार्यरत ठेवली असून बसस्थानक, रेल्वे स्थानक, स्थलांतरित वस्त्या तसेच गर्दीच्या ठिकाणीही लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## जुगार खेळणाऱ्या विरूध्द धडक कारवाई; १ लाख १६ हजारांचा मुददेमाल जप्त

प्रतिनिधी २८ जून



**अमरावती :** पोलीस अधीक्षक अमरावती ग्रामीण निकेतन कदम यांनी पोलीस स्टेशन हददीत वरली जुगार, अवैदय दारू विकी, गावठी हातभटटी व अवैदय रेती वाहतुक, गोवंश वाहतुक यांचे विरूध्द कठोर कार्यवाही करणे बाबत सर्व ठाणेदार यांना आदेशीत केले आहे.

त्यानुसार आज दिनांक २७/०६/२०२६ रोजी पोलीस स्टेशन शिरजगाव कसबा येथील अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे पथक पोस्टे हददीमध्ये अवैदय धंदयाचे विरूध्द कार्यवाही करणे करीता पेट्रोलिंग करीत असतांना मिळालेल्या गोपनीय माहीती वरून १६/०० वा चे सुमारास शेतामध्ये खुल्या जागेमध्ये काही लोक ५२ तास पत्त्यावर एक्का बादशाह नावाचा पैशाच्या हार जितचा जुगार खेळ खेळत असल्याच्या गोपनिय माहीती वरून पंचासमक्ष सदर ठिकाणी जावुन रेड केली असता पोलीसांना पाहुन जुगार खेळणारे लोक पळु लागले आम्ही घटनास्थळी ३ इसमांना जागीच ताब्यात घेतले तसेच ६ इसम पोलीसांना पाहुन पळुन गेले त्यांचा पाठलाग केला असता मिळुन आले नाही. घटनास्थळावर तिन मोसा घटनास्थळावर मिळुन आल्या. तसेच ताब्यात असलेल्या इसमाच्या जवळुन ५२ तास पत्ते किं.अं. ३० रू. व डावासमोर नगदी ९५० रू. अंगझडतीत ४१०० रू तसेच दोन मोबाईल ११००० रूपये व तिन मो.सा. १००००० रूपये असा एकुण असा एकुण १,१६,०८० रू. चा माल मिळुन आल्याने पंचासमक्ष जागीच पंचनामा करून जप्त करण्यात आला. सदर बाबत पोलीस स्टेशन शिरजगाव कसबा येथे अपराध क्रमांक. ३११/२०२६ कलम १२ अ महाराष्ट्र जुगार अधिनियम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचा गुन्हा करणेकामी सहकार्य करणा-या अन्य आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत. सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधिक्षक अमरावती ग्रामीण दत्ता तोटेवाड, पोलीस अधीक्षक उपविभाग अचलपुर मनिष म. ठाकरे यांचे मार्गदर्शनात सपोनि अमन भि. सिरसट, पोउपनि प्रशांत जाधव पोलीस अंमलदार पोहेकॉ दिपेश चंदेल, पोकॉ अनुप टिंगणे, पोकॉ वैभव मांडवगणे, पोकॉ विनीत क्षिरसागर, पोकॉ दिनेश धर्मे यांनी केली आहे.

## घातक शस्त्रासह अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या दोन इसमांवर धडक कार्यवाही

प्रतिनिधी २८ जून




**अमरावती :** पोलीस आयुक्त साहेब यांनी अमरावती शहरा मध्ये अवैध्यरित्या शस्त्र बाळगणा-या इसमांवर तसेच सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ सेवन करण्या-या इसमांवर धाडी टाकुण योग्य प्रभावी कार्यवाही करण्याबाबतचे आदेश प्राप्त झाले वरून गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अतुल वर यांचे नेतृत्वात पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

आर्म ॲक्ट कार्यवाही दिनांक २७ जून रोजी गुन्हे शाखेच्या पथकास गोपनिय बातमीदारा मार्फत माहीती मिळाली कि, महादेवखोरी येथे राहणारा देवा गेडाम हा त्याच्या जवळ लोखंडी चाकू बाळगुण ऑक्सीजन परिसर येथे संशईतरित्या भटकत आहे. वरूण सदर ठिकाणी गुन्हे शाखेचे पथक नावुन नमुद इसमास ताब्यात घेवुन त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कंबरेला असलेला एक लोखंडी चाकु कि.अ. १,०००/- रू जप्त करून त्यांचे विरुध्द पो.स्टे. फ्रेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म ॲक्ट सहकलम १३५ मपोको प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला.

ताब्यात घेण्यात आलेल्या आरोपीचे नाव देवा उर्फ देवीदास गजानन गेडाम वय २७, रा. हनुमान मंदीर जवळ, महादेव खोरी, अमरावती. असे असून ताब्यात घेण्यात आलेल्या मुददेमाल एक लोखंडी चाकु कि.अ. १,०००/- रू जप्त अंमली पदार्थ सेवनाबाबत कार्यवाही केली.

पोस्टे राजापेठ हददीमधील छत्री तलाव येथे आरोपी नामे विवेक विनोद वासनिक वय १९ वर्ष रा. ग्राम पार्टी, (अंजनगाव बारी) अमरावती हा छत्री तलाव येथे सार्वजनिक ठिकाणी गांजा नावाचा अंमली पदार्थाचे सेवन करीत असताना मिळून आल्याने त्याचे विरूध्द पोस्टे राजापेठ येथे कलम २७ एन.डी.पी.एस अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. विवेक विनोद वासनिक वय १९ वर्ष रा. ग्राम पार्टी, (अंजनगाव बारी) अमरावती सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## आयुक्त वर्षा लड्डा यांची अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन केंद्रावर धडक

### ◆ सज्जतेची कसून तपासणी, निष्काळजी कर्मचाऱ्यावर कारवाईचे आदेश

प्रतिनिधी २८ जून

**अमरावती:** पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा कितपत सज्ज आहे, याची प्रत्यक्ष खात्री करण्यासाठी अमरावती महानगरपालिका आयुक्त वर्षा लड्डा यांनी आज सकाळी ८ वाजता कोणतीही पूर्वसूचना न देता अग्निशमन केंद्र व आपत्ती व्यवस्थापन केंद्राला अचानक भेट दिली. या पाहणीत त्यांनी संपूर्ण परिसराची सखोल तपासणी करत अधिकारी व कर्मचाऱ्यांना सतर्क राहण्याच्या कडक सूचना दिल्या.

आयुक्तांनी अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापनासाठी उपलब्ध असलेल्या सर्व यंत्रसामग्री, उपकरणे व साहित्याची बारकाईने पाहणी केली. कोणते साहित्य कार्यरत आहे, कोणते बंद अवस्थेत आहे, त्याची कारणे काय आहेत आणि दुरुस्तीची स्थिती काय आहे, याची सविस्तर माहिती संबंधित अधिकाऱ्यांकडून घेतली. यावेळी त्यांनी विविध उपकरणांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून घेत त्यांची कार्यक्षमताही तपासली.

पाहणीदरम्यान उपस्थिती नोंदवहीची (हजेरी रजिस्टर) तपासणी करताना एक कर्मचारी वारंवार गैरहजर असल्याचे निदर्शनास आले. याची गंभीर दखल घेत संबंधित कर्मचाऱ्यावर तातडीने शासकीय शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी दिले. तसेच पावसाळ्यात आपत्ती व्यवस्थापन विभागातील कोणत्याही कर्मचाऱ्याला विनाकारण सुट्टी देऊ नये, अशा स्पष्ट सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

आपत्ती व्यवस्थापन विभाग शहराच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने प्रत्येक अधिकारी व कर्मचारी २४ तास सज्ज असणे आवश्यक असल्याचे आयुक्तांनी नमूद केले. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांना तात्काळ मदत मिळावी, यासाठी आवश्यक मनुष्यबळ, यंत्रसामग्री आणि साहित्य यांचे नियोजन सक्षम असणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आयुक्तांनी विभागातील कर्मचाऱ्यांच्या अडचणी व समस्या देखील जाणून घेतल्या. आवश्यक सुविधा, उपकरणे आणि साहित्याबाबत कर्मचाऱ्यांनी मांडलेल्या मागण्यांची दखल घेत जे साहित्य उपलब्ध नाही ते तातडीने उपलब्ध करून देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

अमरावती शहराच्या सुरक्षिततेसाठी अग्निशमन व आपत्ती व्यवस्थापन विभागाने नेहमीच महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## शिवसेनेचा जिल्ह्यात विस्तार; अमरावतीत पक्ष क्रमांक एक बनवण्याचा उदय सामंतांचा विश्वास

### ◆ महायुतीत तणाव नसल्याचा दावा; महाविकास आघाडीतील विसंवादावर साधला निशाणा



प्रतिनिधी २८ जून

**अमरावती :** शिवसेना नेते तथा राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनी जिल्हा दौऱ्यादरम्यान पक्षविस्तार, महायुतीतील समन्वय आणि विरोधकांवर टीका करत विविध मुद्द्यांवर भूमिका मांडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सूचनेनुसार जिल्ह्याचा आढावा घेण्यासाठी हा दौरा आयोजित करण्यात आल्याचे सांगत, स्थानिक नेत्यांच्या बळावर भविष्यात अमरावती जिल्ह्यात शिवसेना क्रमांक एकचा पक्ष बनेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. 'ऑपरेशन टायगर' मोहिमेअंतर्गत पक्षविस्तार सुरू असून नागपूरमध्ये काँग्रेसचे अनेक माजी नगरसेवक व पदाधिकारी शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती त्यांनी दिली. महायुतीत कोणताही तणाव नसून सर्व घटक पक्षांमध्ये समन्वय कायम असल्याचा दावा त्यांनी केला. महाविकास आघाडीतील बैठकींना आमदार गैरहजर राहत असल्याने त्यांच्यातील अंतर्गत विसंवाद उघड झाल्याचे सामंत म्हणाले. उद्धव ठाकरे यांच्या विदर्भ दौऱ्यावरही त्यांनी टीका केली. तसेच खासदार संजय दिना पाटील यांच्या वक्तव्याबाबत दिलगिरी व्यक्त करत विषय संपवावा, असे आवाहन केले. महायुतीतील नेते परिपक्व असून वाद निर्माण करण्याचे प्रयत्न निष्फळ ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

## राजापेठ पोलीसांची जुगार रेड



प्रतिनिधी २८ जून

**अमरावती :** २७ जून रोजी राजापेठ पोलीसांनी मिळालेल्या माहितीचे आधारे राजापेठ पोलीसांनी पोलीस स्टेशन हददीतील मेहेरबाबा कॅन्टीन जुना सातुर्णा एम आय डी सी परीसरात जुगारचा खेळ सुरु आहे. अश्या माहितीचे आधारे सदर ठिकाणी रेड केली असता ५ जुगार खेळणारे इसम मिळुन आले असुन, त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन येथे ४,५ महाराष्ट्र जुगार कायदा अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे.

सदर कार्यवाही दरम्यान पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात आरोपी नामे ऋशीकेष शिवदास शिदे वय २७ वर्श रा. सरोज कॉलणी, २) शेख नाजीम शेख नबी वय २७ वर्श रा. रतनगंज अमरावती, ३) मोहम्मद साबीर मोहम्मद छोटु वय २७ वर्श रा.हनुमान नगर अमरावती, ४) वल्लभ भगवानदास जाधव वय २५ वर्श रा. होडा चौक अमरावती, ५) सत्यम प्रमोदराव राउत वय ३० वर्श रा. सरोज कॉलणी अमरावती यांचे कडुन सदर गुन्हात ५२०० रुपयाचा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन सदर गुन्हात इतर फरार ०३ आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर कार्यवाही राकेश ओला पोलीस आयुक्त, श्याम घुगे पोलीस उपायुक्त परि.०२ तसेच श्री संजय खताळे सहायक पोलीस आयुक्त राजापेठ विभाग अम.श. याचे मार्गदर्शनाखाली पोस्टे राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांचे नेतृत्वात सपोनि नितीन शिंदे, पोलीस अंमलदार, मनीष करपे, पवन तिवारी, पंकज खटे, रवि लिखीतकर, अकुंश काळे प्रशांत बेलोकर, अमोल खंडेझोड आकाश यादव, अर्जुन कदम यांनी केलेली आहे.

# कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करतांना अमरावतीच्या 'सीआयआयआयटी' प्रकल्पाला गती देण्याची गरज- आ.संजय खोडके

### ◆ कौशल्य विकासाची उपयोगिता तपासण्यासाठी तांत्रिक समिती गठीत करण्याची राज्यविधिमंडळाकडे सुचना

प्रतिनिधी २८ जून

**अमरावती :** राज्यातील कौशल्य विकास आणि रोजगारनिर्मितीला गती देण्यासाठी खाजगी कौशल्य विद्यापीठ सुधारणा विधेयकाला विधान परिषदेत मंजुरी देण्यात आली आहे. या शासकीय विधेयकावर चर्चा करतांना आ.संजय खोडके यांनी खाजगी कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन करतांना अमरावतीमध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात टाटा टेक्नोलॉजीच्या खाजगी सहभागातून ठसेंटर फॉर इन्व्हेन्शन, इनोव्हेशन, इक्यूबेशन अँड ट्रेनिंग प्रकल्प अर्थात ठसीआयआयआयटीठच्या कौशल्यवर्धन प्रकल्पाला गती देण्याची गरज असल्याची सुचना सभागृहासमक्ष केली. तसेच कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देत असतांना उद्द्योग समूहांना कौशल्यपूर्ण आणि रोजगारक्षम मनुष्यबळ निर्मिती होत असल्याबाबतची उपलब्धता तपासण्यासाठी तांत्रिक समिती नेमण्यात यावी. अशी सूचना सुद्धा आ.संजय खोडके यांनी केली आहे.

महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठ सुधारणा विधेयकावर चर्चा करतांना आ. संजय खोडके म्हणाले कि, या विधेयकाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील रोजगाराच्या संधी वाढविण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. नव्या युगातल्या अत्याधुनिक कौशल्याची गरज ओळखून नव्या विद्यापीठांना मान्यता देण्यात आल्याने त्यांनी शासनाचे अभिनंदन केले. तसेच कौशल्य विद्यापीठांचे अभ्यासक्रम हे उद्योग समूहांना पूरक व स्थानिक भागातील उद्योग क्षेत्राशी निगडीत असावेत. कौशल्य विकासाचे शिक्षण -प्रशिक्षण देणाऱ्या संस्थामध्ये एकसारख्या प्रशिक्षणाचा समावेश नसावा, तर स्थानिक भागातील उद्योगांची गरज व मागणी लक्षात घेता कुशल, प्रगत मनुष्यबळ निर्माण करण्यासाठी कौशल्य विद्यापीठांनी पुढाकार घेण्याचे खरी गरज आहे. ग्रामीण भागातील युवक तसेच बेरोजगार तरुणांना रोजगारक्षम बनविण्यासाठी कौशल्य विकासाच्या उपयोजततेचे परीक्षण वा तपासणी होण्यासाठी एखादी तांत्रिक समितीच्या माध्यमातून योग्य संचलन करण्यात यावे. अशी सुचना सुद्धा आमदार संजय खोडके यांनी केली.




अमरावती जिल्ह्यामध्ये कौशल्य विकासाचे शिक्षण देणाऱ्या बऱ्याच संस्था आहेत. मात्र स्थानिक उद्योग समूहांना अपेक्षित असलेले कौशल्य विकसित करून रोजगार निर्मिती करण्याची आज खरी गरज असल्याचे सुद्धा आ.खोडके यांनी सांगितले. तसेच राज्यात खासगी कौशल्य विकास विद्यापीठ स्थापन होत असतांना अमरावती मध्ये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात टाटा टेक्नोलॉजीच्या खासगी सहभागातून मंजूर असलेल्या २०० कोटींच्या ठसीआयआयआयटीठ प्रकल्पाला गती देण्याची गरज असल्याची सुचना आमदार संजय खोडके यांनी विधान परिषदेत केली.

अमरावती जिल्ह्यात आयटीचे शिक्षण देणाने तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था आहेत. स्थानिक भागातील तरुणांना रोजगाराभिमुख या कौशल्यवर्धन प्रशिक्षण व नोकरी देण्यासाठी दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या दूरदृष्टीतून राज्यात टाटा टेक्नोलॉजी च्या माध्यमातून ठसीआयआयआयटीठ प्रकल्प उभारण्यात आला. राज्यातील गडचिरोली येथे ठसीआयआयआयटीठ प्रकल्प कार्यान्वित झाला असून अमरावतीच्या ठसीआयआयआयटीठ प्रकल्पाना अजूनही गती मिळाली नाही. कौशल्य विकास विद्यापीठाचा संदर्भ देऊन अमरावती येथील ठसीआयआयआयटीठ प्रकल्पाला प्रोत्साहन देण्यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अशी सुचना आ.संजय खोडके यांनी राज्यविधिमंडळासमक्ष केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
रविवार दि २८ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

गेले ते गद्दार, राहीले ते खुद्दार...









# मुलीच्या सोयरिकीचे कारण, खोक्याच्या बोलणीचे धोरण !

## *खा. संजय देशमुखांवर उध्दव ठाकरेंचा घाणाघात *वाशीम शिवसेनेचा बालेकिल्ला, भाषणातून चौफेर हल्ला

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



गेले ते गद्दार, राहीले ते खुद्दार मुलीच्या सोयरिकीचे कारण सांगून खोक्याच्या बोलणीच्या धोरणावर शिवसेनेचे खासदार संजय देशमुख यांनी गद्दारी करून मतदारांच्या पाठीत खंजीर खुपसला असल्याचा घाणाघात प्रहार पक्षप्रमुख उध्दव ठाकरे यांनी वाशीम येथील आयोजित जैन भवन येथील कार्यकर्ता मेळाव्यात केला.

खासदार संजय राऊत ह्यांच्या खमक्या भाषणामुळे लोकांनी हे सभागृह डोक्यावर घेतले.खासदार अरवींद सावंतांनी आम्ही महाराष्ट्रभर दौऱ्यावर निघालो आहो हिम्मत असेल तर गद्दारांनो पुढे या असे खुले चॉलेंज केले.विरोधीपक्षनेते अंबादास दानवे यांनी फुटीर खासदारांचा खरपूस समाचार घेतला.खासदार संजय देशमुखांचा पक्षफुटीरपणा ?आमदार नितीन देशमुखांच्या मोठ्या प्रमाणात जिव्हारी लागल्याचे त्यांच्या भाषणातून समोर आले.तर दुसऱ्या बाजूने गतवेळी लाखांवर मते घेणाऱ्या डॉ सिद्धार्थ देवळे यांच्या येणाऱ्या काळातील उमेदवारीचे संकेत दिले.यांच्यासह संवाद सभेला यूवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे, खासदार अनिल देसाई,वणीचे आमदार देरकर, जिल्हा संपर्कप्रमुख दिलीपराव जाधव, सह संपर्कप्रमुख डॉक्टर सुधीर कव्हर, जिल्हा समन्वयक डॉ सिद्धार्थ देवळे, संघटक गजाननराव देशमुख लोकसभा संघटक कॅप्टन प्रशांत पाटील सुर्वे युवा सेना चे पदाधिकारी वरूण सरदेसाई,प्रदेश सचिव सुरज चव्हाण,सह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी शिवसेना (ऊबाठा) पक्षाचे आमदार नितीन देशमुख यांनी खासदार संजय देशमुख यांनी शिवसेना (ऊबाठा) पक्षाशी गद्दारी करुन शिंदेसेनेत गेल्याबाबत कमालीचा संताप व्यक्त करून सडेतोड टिका करत मतदारांनी याचा जाब विचारला पाहिजे असेही त्यांनी सुचविले. उपजिल्हाप्रमुख दत्ता पाटील तुरक, अनील पाटील राऊत, डॉ.चंद्रशेखर देशमुख, विधानसभा प्रमुख अशोक राव अंभोरे, गोपाल पाटील यवतकर, विधानसभा समन्वयक सुभाषराव बोरकर,रवी पाटील, विधानसभा संघटक पांडुरंग पांढरे पाटील,सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप, विवेक नाकाडे, रिसोड तालुका प्रमुख नारायणराव आरू, मालेगाव तालुकाप्रमुख उध्दव पाटील गोडे, कारंजा तालुकाप्रमुख विलास सुरळकर,मानोरा तालुकाप्रमुख रवींद्र पवार, वाशीम वाशीम जिल्हा परिषदेचे माजी सभापती विश्वनाथ सानप, विधानसभा समन्वयक अशोकराव अंभोरे,रिसोड तालुका प्रमुख नारायणराव आरू, मालेगाव तालुकाप्रमुख उध्दवराव गोडे,मानोरा तालुकाप्रमुख रवींद्र पवार, कारंजा तालुका प्रमुख विलास सूरळकर, वाशीम शहरप्रमुख गजाननराव भांदुर्गे,मंगरूळपीर शहरप्रमुख सचीन परळीकर , मालेगाव शहरप्रमुख आशीष डहाळे,मानोरा शहरप्रमुख संतोष पुरी, कारंजा शहरप्रमुख राजू ठाकरे, रिसोड शहरप्रमुख संजय इरतकर, सर्कल प्रमुख माणीक कव्हर, संतोष माने, संतोष सूर्वे,आनंदा काळे, गणेश ईंगोले, विनोद वारकड, संजय ठोंबरे , दिलीप शिंदे, दादाराव धनगर, शंकर सावके, गणेश गाभणे, राजू रंगभाळ,बबलू आहिर,बंडू शिंदे, चंद्रकांत खेलूरकर, वाशीम न.प.माजी नगराध्यक्ष लक्ष्मणराव ईंगोले,नगर उपाध्यक्ष राजु भाऊ भांदुर्गे,माजी उपनगराध्यक्ष गजानन जोगदंड, गटनेते गजानन दहात्रे,स्थायी समिती सदस्य तथा नगरसेवक साबीर मिर्झा, नगरसेविका श्रध्दाताई ईंगोले, कृष्णाताई गोरे,सोनूताई बढेल , युवा सेना जिल्हाप्रमुख जुबेर मोहनावाले, उपजिल्हाप्रमुख रामहरी सावके, प्रफुल्ल देवळे,महीला आघाडी जिल्हाप्रमुख मंगलाताई सरनाईक,युवती सेना जिल्हाप्रमुख प्रियाताई महाजन, महीला आघाडी तालुकाप्रमुख ज्योतीताई खोडे, वाशीम शहरप्रमुख रंजना पारिसकर,सुनीताताई गव्हाणकर,रोहीणीताई गोरे, मालेगाव शहरप्रमुख सौ.सिमा प्रशांत लोखंडे, यांच्या सह पदाधिकारी व शिवसैनिक यांची उपस्थिती होती. ? यावेळी वाशीम जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे,वाशीम जिल्हा समन्वयक तथा प्रसिद्ध हृदयरोगतज्ञ डॉ सिद्धार्थ देवळे,विधानसभा समन्वयक सुभाषराव बोरकर,उपजिल्हाप्रमुख अनिल पाटील राऊत,चला हवा येऊ द्या फेम किशोर बळी,रिसोड विधानसभा समन्वयक अशोकराव अंभोरे,मानोरा तालुकाप्रमुख रवींद्र पवार, यूवासेनाचे पदाधिकारी अर्जून भिमराव सुर्वे,शिवा सावके,आदींची समयोचीत भाषणं झाली.

**पक्षप्रवेश** - संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी तथा केमिस्ट अँड ड्रगीस्ट संघटनेचे वाशीम तालुकाध्यक्ष कृष्णा चौधरी, आणि भारतीय जनता पक्षाचे ओबीसी सेलचे वाशिम जिल्हाध्यक्ष शंकरराव रेखे ह्यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांच्या हस्ते शीवसेना (ऊध्दव बाळासाहेब ठाकरे)पक्षात प्रवेश केला.

यवतमाळ वाशीम लोकसभा मतदारसंघाचे शिवसेना पक्षाकडून विजयी होत सुमारे पाच लाख नव्वद हजारांच्या आसपास मतदारांशी प्रतारणा करुन ऊपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या शिवसेनेत पक्षांतर केल्याबद्दल आलेली चिड आणि संताप आणणारी बाब कडवे शिवसैनिक म्हणून मालेगाव तालुक्यातील विजय शेंडगे, गजानन बोरचाटे आणि भगवान बोरकर यांनी प्रखरपणे मांडल्याबाबत विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांच्या हस्ते आमदार नितीन देशमुख व आमदार दरेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाशीम जिल्हा परिषदेचे माजी सभापती विश्वनाथ सानप यांनी केले.

---


## थोडक्यात

### बियाणे वितरणासाठी शेतकऱ्यांची निवड होईना !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

खरीप हंगामाच्या तोंडावर कृषी विभागाने जिल्ह्यातील सोयाबीन उत्पादकांसाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया (गळीतधान्य-सोयाबीन) योजनेंतर्गत १०० टक्के अनुदानावरील सोयाबीन वाटप प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन केले होते. यास शेतकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला. गावागावातून शेकडो अर्ज दाखल झाले. मात्र आता बियाणे वितरणासाठी शेतकऱ्यांची निवड होत नसल्याने योजना 'असून अडचण, नसून खोळंबा', अशी गत सध्या बियाणे वितरण योजनेची झाली आहे.

खरीप पेरणी हंगामाच्या तोंडावर राज्यात महाबीजच्या सोयाबीन बियाणांचा यंदा मोठ्या प्रमाणात तुटवडा जाणवत आहे. खासगी कंपन्यांचे महागडे बियाणे शेतकऱ्यांना परवडत नसल्याने महाबीजच्या सोयाबीन बियाण्याची प्रतीक्षा असताना बाजारात बियाणे मिळत नाही. कृषी विभागाच्या मोफत बियाणांसाठी बोटावर मोजता येतील एवढ्याच महिला शेतकऱ्यांची निवड झाली आहे. या योजनेत शंभर टक्के महिलांना प्राधान्य देण्यात आले आहे. मात्र पुरुषांच्या तुलनेत १० टक्केही क्षेत्र महिलांच्या नावे नाही. त्यामुळे या योजनेतून ९० टक्के पुरुष शेतकरी वंचित राहत आहेत. महिला शेतकऱ्यांना प्राधान्य देण्याच्या नावाखाली ९० टक्के पुरुष शेतकरी वंचित ठेवण्याची चलाखी कृषी विभागाने केली आहे. शेतकऱ्यांना पेरणीसाठी हातभार लागावा, या उद्देशाने कृषी विभाग दरवर्षी अनुदानावर बियाणे वाटप करतो. या योजनेतून शेतकऱ्यांना मोठा आर्थिक हातभार लागत असतो. मात्र यंदा कृषी विभागाने ज्यांना बियाणे पाहिजे आहे त्यांनी ऑनलाईन नोंदणी करण्याची सक्ती केली खरी, परंतु ऑनलाईन करूनही कृषी विभागाने महिलांना प्राधान्य देण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात शेतकरी वंचित ठेवले आहेत.


चि. यश देवा बेलखेडकर
हुडको कॉलनी
मंगरूळपीर
दुसरा वाढदिवस

## बाभळीच्या झाडांनी कोल्हापुरी बंधारा जाम; पुलासह गावालाही धोका !

**पिंप्री सरहद्द येथील प्रकार**

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

उतावळी व कांचन नदीच्या उगम भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे आज पहाटे नदीला महापूर आला. या पार्श्वभूमीवर रिसोड तालुक्यातील पिंपरी सरहद्द येथील कोल्हापुरी बंधाऱ्याची गंभीर अवस्था समोर आली आहे. बंधाऱ्यात मोठ्या प्रमाणात बाभळीची झाडे व फुरसण अडकून बंधारा पूर्णपणे जाम झाला असून पाण्याचा नैसर्गिक प्रवाह अडथळला आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, बंधाऱ्यातील



अडथळ्यांमुळे पाणी सुरळीत वाहू शकत नाही. परिणामी पाण्याचा दाब वाढल्यास पाणी इतर ठिकाणाहून फोड घेण्याची शक्यता असून, त्यामुळे पूल, रस्ता आणि गावालाही धोका निर्माण होऊ शकतो. सध्या परिस्थिती गंभीर असूनही संबंधित विभागाकडून कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की, 'बंधाऱ्यात अडकलेली बाभळीची झाडे व फुरसण तातडीने हटवून पाण्याचा प्रवाह सुरळीत केला नाही, तर मुसळधार पावसात मोठी दुर्घटना घडू शकते. गावातही पूराचे पाणी शिरण्याचा धोका आहे.' स्थानिक नागरिकांनी तहसील प्रशासन, जलसंपदा विभाग आणि संबंधित यंत्रणांनी तात्काळ पाहणी करून बंधाऱ्यातील अडथळे हटवावेत, अशी मागणी केली आहे. वेळीच उपाययोजना केल्यास संभाव्य पूरस्थिती आणि मोठे नुकसान टाळता येऊ शकते, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

## दूध व दुग्धजन्य पदार्थांचा तुटवडा !

### भेसळीबाबत नागरिकांमध्ये चर्चा

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●



मंगरूळपीर तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून दूध, पनीर, दही तसेच इतर दुग्धजन्य पदार्थांचा तुटवडा जाणवत असल्याने नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. पूर्वी अनेक दूध डेअऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात दूध, पनीर व दही सहज उपलब्ध होत होते. मात्र अचानक निर्माण झालेल्या तुटवड्यामुळे नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

काही सामाजिक कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की, तालुक्यातील जनावरांची संख्या कमी झालेली नसताना दुग्धजन्य पदार्थांचा तुटवडा कसा निर्माण झाला, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच राज्यभर अन्नपदार्थांमधील भेसळीविरोधात सुरू असलेल्या कारवायांच्या पार्श्वभूमीवर दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबतही नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.दरम्यान, तालुक्यातील काही हॉटेल्स, खाद्यपदार्थ विक्रेते व पानटपऱ्यांवर स्वच्छता नियमांचे पालन होत नसल्याचा आरोपही नागरिकांकडून करण्यात येत आहे. अनेक ठिकाणी खाद्यपदार्थ उघड्यावर विकले जात असल्याने धूळ व प्रदूषणाचा परिणाम अन्नावर होत असल्याची तक्रार आहे.

तसेच वापरलेल्या तेलाचा वारंवार वापर केला जात असल्याबाबतही नागरिकांनी चिंता व्यक्त केली आहे.

## शेतकऱ्यांच्या हितासाठी महायुती सरकार कटीबद्ध

### रब्बी हंगामासाठी वीज समस्या राहणार नाही -आ.खोडे

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

रब्बी हंगामासाठी शेतकऱ्यांना विज पुरवठ्याबाबत कोणतीही समस्या निर्माण होऊ नये या करीता वाशिम-मंगरूळ विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्याम खोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे समोर गंभीर विषय मांडला व शेतकऱ्यांना रब्बी हंगामात अविरत वीजपुरवठा व्हावा या करीता आताच उपाययोजना करण्याची विनंती केली. दरवर्षी रब्बी हंगामाच्या वेळेस शेतकऱ्यांना ओलितासाठी वीजपुरवठ्याची नितांत आवश्यकता असते. रोहित्र जाळले तर वेळेवर उपलब्ध राहत नाही. पावसाळी अधिवेशानादरम्यान आमदार श्याम खोडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांची भेट घेऊन त्यांचा समोर ही समस्या मांडली व आतापासूनच उपाययोजना करण्याची विनंती केली आहे. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद



देऊन मा. मुख्यमंत्र्यांनी १०० के. व्ही.ए. चे एकशे पन्नास रोहित्र वाशिम-मंगरूळ विधानसभा मतदारसंघासाठी उपलब्ध सुद्धा करून दिले ६५ के.व्ही.ए. च्या ऐवजी १०० के.व्ही.ए. चे रोहित्र जास्त भार वहन करू शकतात तसेच शेतकऱ्यांची प्रलंबित वीज जोडणी त्वरित करण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांना याबाबत सूचना देण्यात येतील असे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आमदार श्याम खोडे यांना आश्वस्त केले यामुळे शेतकऱ्यांना भविष्यात वीज पुरवठ्याचा त्रास होणारी नाही अशी ग्वाही आमदार श्याम खोडे यांनी दिली.

## पाऊस सर्वदूर, पुन्हा महापूर!

### पिंपरी सरहदला पुन्हा गतवर्षीच्या विध्वंसाची आठवण

● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●



पिंपरी सरहद परिसरात पुन्हा एकदा महापुराने गतवर्षीच्या भीषण परिस्थितीची आठवण करून दिली आहे. मागील वर्षी उतावळी व कांचन नदीला तब्बल सात ते आठ वेळा महापूर आल्याने पिंपरी सरहदसह परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. अनेकांची पेरणी वाहून गेली, तर अनेकांच्या शेतजमिनी अक्षरशः खरडून गेल्या. काही ठिकाणी सुपीक माती वाहून जाऊन दगड उघडे पडले असून अनेक शेतीक्षेत्रे आजही पडीत आहेत.

यावर्षीही पावसाच्या सुरुवातीलाच आज पहाटे सुमारे ३ वाजल्यापासून उतावळी व कांचन नदीला महापूर आल्याने मेहकर–मालेगाव महामार्ग काही काळासाठी वाहतुकीस बंद झाला. त्यामुळे वाहनचालकांना मोठा फटका बसला. दरम्यान, नदीकाठावरील शेतकऱ्यांनी हळद, भाजीपाला, मिरची, वांगी आदी पिकांची लागवड केली होती.

मात्र महापुराचे पाणी थेट शेतात शिरल्याने ही पिके पाण्याखाली गेली असून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.गतवर्षीच्या जखमा अद्याप भरलेल्या नसतानाच यंदाच्या पहिल्याच महापुराने शेतकऱ्यांची चिंता वाढवली आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी परिसरातून होत आहे.

## दवाखान्याचे नाव, ठिकाण पुरावे सर्व काही स्पष्ट, तरीही कारवाई शून्य !

### *आरोग्य विभाग अनभिज्ञ की दुर्लक्ष * सिटी न्यूज सुपरफास्टच्या बातमीची दखल घेत दवाखान्यासमोरील जैविक कचरा हटवला; पण तो गेला कुठे?

● प्रभाकर नाईकवाडे @ केनवड ●

केनवड येथील खासगी दवाखान्यासमोर घातक जैविक वैद्यकीय कचरा उघड्यावर जाळला जात असल्याचे वृत्त सिटी न्यूज सुपरफास्टने प्रसिद्ध केल्यानंतर संबंधित दवाखान्यासमोरील कचरा हटवण्यात आल्याचे दिसून आले. मात्र त्यामुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.जर जैविक कचऱ्याची नियमानुसार विल्हेवाट लावली जात असेल, तर दवाखान्यासमोर तो कचरा आला कसा? आणि बातमी प्रसिद्ध होताच तो इतक्या घाईने का हटवण्यात आला? हटवलेला कचरा अधिकृत जैविक कचरा प्रक्रिया केंद्राकडे पाठविण्यात आला की केवळ दुसऱ्या ठिकाणी हलविण्यात आला? याबाबत संबंधित विभागाने स्पष्ट भूमिका मांडणे आवश्यक आहे.

विशेष म्हणजे या प्रकरणात दवाखान्याचे नाव, ठिकाण, छायाचित्रे आणि प्रत्यक्ष परिस्थिती समोर असूनही संबंधित यंत्रणेकडून




अद्याप कोणतीही ठोस कारवाई झाल्याचे दिसून आलेले नाही. त्यामुळे आरोग्य विभाग या प्रकाराबाबत अनभिज्ञ होता की दुर्लक्ष करण्यात आले? असा प्रश्न नागरिक उपस्थित करत आहेत.राष्ट्रीय महामार्गालगत, अकोला जिल्हा मध्यवर्ती बँक, एसबीआय, सेतू केंद्र, एसटी बसथांबा आणि ग्रामीण आरोग्य उपकेंद्राच्या परिसरात घातक जैविक कचरा आढळणे ही अत्यंत गंभीर बाब मानली जात आहे. अशा ठिकाणी दररोज शेकडो नागरिकांची वर्दळ असते. जैविक वैद्यकीय कचरा संसर्गजन्य असल्याने त्याची शास्त्रशुद्ध विल्हेवाट लावणे कायद्याने बंधनकारक आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, केवळ कचरा हटवून प्रकरण संपत नाही. नियमभंग झाला असेल, तर त्याची निष्पक्ष चौकशी होऊन जबाबदारांवर नियमानुसार कारवाई झाली पाहिजे. अन्यथा नियम केवळ कागदावरच राहतात का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.आता नागरिकांचे लक्ष आरोग्य विभाग, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हा प्रशासनाच्या पुढील भूमिकेकडे लागले आहे. या प्रकरणाची चौकशी करून वस्तुस्थिती जाहीर केली जाईल का, दोषी आढळल्यास कारवाई होईल का, याकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

### आरोग्य विभाग निष्क्रिय; नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणारे सक्रिय!

केनवडमध्ये घातक जैविक वैद्यकीय कचऱ्याची अयोग्य विल्हेवाट लावली जात असल्याचा आरोप वर्षभरापासून होत असताना संबंधित यंत्रणेकडून ठोस कारवाई झाल्याचे दिसत नाही. विशेष म्हणजे वृत्त प्रसिद्ध होताच दवाखान्यासमोरील कचरा हटविण्यात आला, मात्र नियमभंगाबाबत कोणती कारवाई झाली, याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. नागरिकांचा सवाल स्पष्ट आहे. कचरा हटविण्याची तत्परता दिसली, मग नियमभंग करणाऱ्यांवर कारवाईची तत्परता का दिसली नाही? त्यामुळे आरोग्य विभागाच्या देखरेखीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.




## शासनाचा निर्णय, शेतकऱ्याची कटकट मिटली ई-पीक पाहणीची डोकेदुखी संपली; सहाय्यकच करणार डिजिटल नोंद !

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत राज्य शासनाने यंदाच्या खरीप हंगामापासून ई-पीक पाहणीसाठी विशेष सहाय्यकांची नियुक्ती करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना स्वतः मोबाईल पवर पीक नोंदणी करण्याची गरज राहणार नसून, नियुक्त सहाय्यक थेट शेतात जाऊन पिकाची अचूक नोंदणी करणार आहेत.

यासंदर्भात शासनाने आदेश जारी केले असून खरीप हंगामातील ई-पीक पाहणीचे प्रारंभ होताच गावात तहसीलदारांनी नियुक्त केलेले सहायक हे पीक पाहणी करून नोंदणी करणार आहेत. मागील काही वर्षांत ई-पीक पाहणी करताना नेटवर्कचा अभाव, अचूक लोकेशन न मिळणे, फोटो



अपलोड न होणे, स्मार्टफोनची अनुपलब्धता आणि तांत्रिक अडचणी यांमुळे अनेक शेतकरी त्रस्त होते. परिणामी सातबाऱ्यावर पिकाची नोंद वेळेवर होत नव्हती. या पार्श्वभूमीवर शासनाने ही प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी सहाय्यकांची नियुक्ती करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

ई-पीक पाहणीची संपूर्ण प्रक्रिया केंद्र सरकारच्या ॲग्रीस्टॅक डिजिटल कृषी परिसंस्थेशी जोडली जाणार आहे. पीक पाहणी पूर्ण झाल्यानंतर त्याची खात्रीशीर माहिती आणि पुष्टीकरणाचा संदेश शेतकऱ्याच्या मोबाईलवर पाठविण्यात येणार आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट बुलडाणा
रविवार, दि. २८ जून २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

## घीर्णी रोड परिसरातून मोटार सायकल चोरी

**मलकापूर :** शहरातील घीर्णी रोड परिसरातील रुक्मिणी ले-आऊटमधून अज्ञात चोरट्याने मोटारसायकल लंपास केल्याची घटना घडली असून, याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, भागवत तुकाराम कोरडे (वय ४७, रा. मुक्ताईनगर, जि. जळगाव) यांनी आपली काळ्या रंगाची होंडा शाईन (क्र. Mh-19 DU-7668) मोटारसायकल दि. १७ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते ८.३० वाजेदरम्यान घीर्णी रोड येथील रुक्मिणी ले-आऊट परिसरात उभी केली होती. दरम्यान, अज्ञात चोरट्याने सुमारे ४० हजार रुपये किमतीची ही दुचाकी चोरून नेली. या प्रकरणी फिर्यादीच्या तक्रारीवरून दि. २७ जून रोजी मलकापूर शहर पोलीस ठाण्यात कायम गुन्हा क्र. ४७३/२०२६, कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# मुसळधार पावसाचा तडाखा: नांदुरा तालुक्यातील वडाळी शिवारातील पूल वाहून गेला

### शेतकऱ्यांचे लाखोंचे नुकसान, तातडीच्या मदतीची मागणी

प्रतिनिधी २८ जून

**नांदुरा:** नांदुरा तालुक्यातील वडाळी शिवारात २६ जून रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. वडाळी, वडगाव, धानोरा बु, वसाडी येथे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे.वडाळी शिवारात शेतकऱ्यांनी स्वतःच्या खर्चातून बांधलेला नाल्यावरील पूल पुराच्या पाण्यात पूर्णपणे खचून वाहून गेल्याने शेतात जाण्याचा मार्ग बंद झाला आहे. यामुळे परिसरातील शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे ठाकले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

वडाळी शिवारात भास्कर पुंडलिक वकटे, अशोक पुंडलिक वकटे, गजानन पुंडलिक वकटे तसेच इतर अनेक शेतकऱ्यांची शेती आहे. या शेतांमध्ये जाण्यासाठी नाल्यावरूनच ये-जा करावी लागते. दरवर्षी पावसाळ्यात या नाल्याला मोठा पूर येत असल्याने शेतकऱ्यांना शेतीची कामे करताना मोठ्या अडचणींचा



सामना करावा लागत होता. या समस्येवर उपाय म्हणून संबंधित शेतकऱ्यांनी कोणतीही शासकीय मदत न घेता स्वतःच्या खर्चातून पूल उभारला होता.

मात्र २६ जून रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे नाल्याला मोठा पूर आला आणि पुराच्या प्रचंड वेगामुळे हा पूल पूर्णपणे खचून वाहून गेला. त्यामुळे शेतकऱ्यांचा शेताशी संपर्क तुटला असून पेरणी, मशागत, औषध फवारणी तसेच इतर शेतीची कामे ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे.

याशिवाय मुसळधार पावसामुळे परिसरातील धानोरा येथील सिद्धार्थ रूपचंद तायडे यांच्या शेतातील विहीर खचली आहे.देवेंद्र तायडे यांच्या कांदा चाळ मध्ये पाणी घुसून हजारांचे नुकसान झाले.अनेक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचले असुन पिकांचे नुकसान झाले आहे.

अनेक शेतांमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साचले आहे. त्यामुळे पिकांचेही मोठे नुकसान झाले असून शेतकऱ्यांवर दुहेरी संकट कोसळले आहे. शेतीतील उभ्या पिकांचे नुकसान, वाहून गेलेला पूल आणि शेतीपर्यंत पोहोचण्याचा मार्ग बंद झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. प्रशासनाने तातडीने पंचनामा करून नुकसानग्रस्तांना आर्थिक मदत द्यावी, वाहून गेलेल्या पुलाची त्वरित पुनर्बांधणी करावी अशी मागणी करण्यात येत आहे.

## मलकापूर शहराचा पाणी पुरवठा १० ते १५ दिवसांवर

प्रतिनिधी २८ जून

**मलकापूर :** मलकापूर शहराचा पाणी पुरवठा १० ते १५ दिवसांवर आलेला आहे. त्यामुळे शहर वासियांमध्ये न.प. प्रशासन तथा सत्ताधाऱ्यांविरूध्द तीव्र असंतोष खदखदत आहे. त्यामुळे आज २७ जून रोजी सामाजिक कार्यकर्ते राहुल जाधव यांनी पाणी पुरवठा विभागाच्या कार्यालयावर जावून कॅबीनची तोडफोड करीत आपला न.प. प्रशासना विरूध्द निषेध नोंदविला.

शहराला १० ते १५ दिवसाआड म्हणजेच महिन्यातून दोन वेळा पाणी पुरवठा होत आहे. यामध्ये सत्ताधारी व न.प. प्रशासनाच्या दिरंगाईमुळे व नियोजनशून्य कारभारामुळे शहर वासियांना पिण्याच्या पाण्याकरीता वनवन भटकावे लागत आहे. याविरूध्द नुकताच जनआक्रोश मोर्चा काढून सत्ताधारी व न.प. प्रशासनाला चांगलेच धारेवर धरण्यात आले होते. तर आज शिवाजी नगर येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल जाधव यांनी पाणी पुरवठा विभागाच्या जलशुध्दीकरण केंद्रावर जावून तेथील कार्यालयाची तोडफोड करीत आपला रोष व्यक्त केला. यावेळी पाणी पुरवठा सभापती शहेजाद खान हे सुध्दा उपस्थित होते. त्यांच्या समोरच सदरचा प्रकार घडला. त्यानंतर सायंकाळी या घटनेबद्दल शहर पो.स्टे.ला तक्रार देण्याची कारवाई सुरू होती.

## शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी युवक काँग्रेसचे आंदोलन

प्रतिनिधी २८ जून

**खामगाव :** विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ करणाऱ्या केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी आज दि. २७ जून रोजी खामगाव येथील एसडीओ कार्यालयासमोर खामगाव विधानसभा युवक काँग्रेस कडून आंदोलन करण्यात आले. यावेळी जोरदार निदर्शने करीत धर्मेंद्र प्रधान व केंद्र सरकारचा निषेध नोंदविण्यात आला.

महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज मोरे, प्रदेश उपाध्यक्ष अनुराग भुयार, बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेसचे प्रभारी नितेश वानखडे यांच्या सूचनेनुसार बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेस द्वारा व खामगाव विधानसभा युवक काँग्रेस तर्फे नीट पेपर लिक विरोधात आंदोलन करण्यात आले. भारताचे



अकार्यक्षम शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा झालाच पाहिजे ही आग्रही मागणी या आंदोलनामध्ये करण्यात आली. भारताची शिक्षण पद्धती सध्या आयसीयू मध्ये आहे, तिला पुनर्जीवित करण्यासाठी सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घ्यावे व शिक्षण मंत्र्यांचा तात्काळ राजीनामा घेवून हकालपट्टी करावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. यावेळी खामगाव शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, तालुकाध्यक्ष तेजेंद्रसिह चौहाण, कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, खामगाव विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अचलेश्वर दिपके, अल्पसंख्याक आघाडी शहर अध्यक्ष बबलू पठाण, नगरसेवक मो.इसा, निलेश देशमुख, पंकज गमे, गिरीश देशमुख, आकाश शंकरवार यांच्यासह काँग्रेस, युवक काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शाहु महाराज सामाजिक न्यायाचे शिल्पकार - माजी आ. राणा दिलीपकुमार सानंदा

### राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने छत्रपती शाहु महाराज जयंतीनिमित्त अभिवादन

प्रतिनिधी २८ जून

**खामगाव :** छत्रपती शाहु महाराज हे महाराष्ट्रातील महान समाज सुधारक व कल्याणकारी राजा आणि शिक्षण प्रेमी शासक होते. छत्रपती शाहु महाराजांनी सर्व समाज घटकांसाठी शिक्षण उपलब्ध व्हावे यासाठी अनेक शाळा, वस्तीगृहे आणि शिष्यवृत्ती सुरु केल्या. मागासवर्गीयासाठी नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षण लागु केले.अस्पृश्यता, निर्मुलन, जाती भेदाविरोधात कार्य करुन सर्व समाज घटकांना समान न्याय देण्यावर त्यांनी नेहमी भर दिला.छत्रपती शाहु महाराज सामाजिक न्यायाचे शिल्पकार आहे असे प्रतिपादन माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी केले.दि. २६ जून २०२६ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने



जनसंपर्क कार्यालय येथे छत्रपती शाहु महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणुन राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पंजाबरावदादा देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर अध्यक्षा श्रीमती सरस्वतीताई खासने, खामगाव तालुका अध्यक्ष मनोज वानखडे, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर उपाध्यक्ष नरहरी टीकार गुरुजी, संजय शर्मा, अल्पसंख्यांक सेलचे तालुका अध्यक्ष बिलाल खा पठान, बाजार समितीचे संचालक विलाससिंग इंगळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलतांना माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा म्हणाले की, राजश्री शाहु महाराज यांना सामाजिक न्यायाचे जनक आणि लोकल्याणकारी राजा म्हणुन ओळखले जाते.त्यांच्या विचारांचा वारसा जपत समाजात बंधुभाव, समानता आणि शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी प्रत्येकाने पुढाकार घ्यावा असे आवाहन सानंदांनी यावेळी केले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते पंजाबदादा देशमुख यांनी बहुजनाच्या उन्नतीसाठी आपले संपुर्ण आयुष्य वेचणाऱ्या छत्रपती शाहु महाराजांच्या कार्याचा गौरव करीत सर्वांनी बहुजन कल्याणाचा विचार पुढे न्यावा असे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर उपाध्यक्ष नरहरी टीकार यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

सर्वप्रथम छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रतिमेला माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.यावेळी उपस्थितांनी छत्रपती शाहु महाराज यांच्या प्रमिमेला पुष्प अर्पण करुन अभिवादन केले. यावेळी उपस्थित जयंतीनिमित्त माजी आमदार राणा दिलीपकुमार सानंदा यांनी पेढे वाटप करुन तोंड गोड केले.यावेळी छत्रपती शाहु महाराज जय की जय अश्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. या कार्यक्रमाला एजाज देशमुख, धनंजय वानखडे, निलेश शर्मा, अविनाश ढगे, प्रफुल कुळकर्णी, निलेश तासतोडे, अनंता धामोडे, संतोष आटोळे, शिवा फेटेवाले, गजानन जाधव, जैनु शाह, विठठ्ल चव्हाण, रामदास गावंडे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## लोंबकळलेल्या तारा, वाकलेले खांब; सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर !

### खेर्डा येथील शेतकऱ्याच्या मृत्यूनंतर संताप

प्रतिनिधी २८ जून

**खामगांव:** जळगाव जामोद तालुक्यातील खेर्डा खुर्द येथे शेतात काम करत असताना विद्युत खांबाच्या ताणाचा शॉक लागून एका शेतकऱ्याचा मृत्यू झाल्याच्या घटनेनंतर जिल्ह्यातील सदोष वीज यंत्रणेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. शेतशिवारातील अनेक ठिकाणी लोंबकळलेल्या वीजतारा, वाकलेले विद्युत खांब आणि देखभालीअभावी जीर्ण झालेली यंत्रणा यामुळे शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

खामगाव तालुक्यातील पिंप्राळा, कोलोरी, चितोडा, हिंगणा, कारेगाव, पळशी, कदमापूर, लोणी, आवार, विहीगाव, ग्रीस निळगाव, रातील अटाळी, आंबेटाकळीसह अनेक गावांमध्ये शेतातून जाणाऱ्या वीजवाहिन्या धोकादायक अवस्थेत असल्याचे दिसून येते. काही ठिकाणी वीजतारा जमिनीपासून अवघ्या सहा ते सात फूट उंचीवर आल्या आहेत. त्यामुळे ट्रॅक्टर तसेच इतर कृषी यंत्रांसह शेतीची कामे करताना शेतकऱ्यांना विशेष काळजी घ्यावी लागत आहे. अनेक ठिकाणी विद्युत खांबही मोठ्या प्रमाणात वाकले असून, ते केव्हाही कोसळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. खेर्डा खुर्द येथील घटना ही शेतशिवारातील वीज यंत्रणेच्या नियमित देखभाल व दुरुस्तीची आवश्यकता अधोरेखित करणारी ठरली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्येही सुरक्षिततेबाबत चिंता वाढली आहे.

अनेक ठिकाणी संबंधित लाईनमन मुख्यालयी राहत नसल्याने नागरिकांनाच जीव धोक्यात घालून विद्युत रोहित्र तसेच वीज यंत्रणेतील किरकोळ दुरुस्तीची कामे करावी लागत असल्याचे सांगितले जाते. अशा प्रकारे प्रशिक्षित कर्मचाऱ्यांऐवजी सामान्य नागरिकांकडून वीज यंत्रणेवर काम केले जात असल्याने गंभीर दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.

**महावितरणने धोकादायक वीज यंत्रणेची दुरुस्ती करण्याची मागणी**

पावसाळ्यात वीजवाहिन्यांमध्ये बिघाड होण्याची शक्यता अधिक असल्याने शेतकऱ्यांनी लोंबकळलेल्या वीजतारा, वाकलेले खांब किंवा विद्युत प्रवाहाचा संशय असलेल्या ठिकाणांपासून सुरक्षित अंतर ठेवावे, तसेच अशा धोकादायक बाबींची तातडीने महावितरणकडे माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे. संभाव्य अपघात टाळण्यासाठी महावितरणने शेतशिवारातील धोकादायक वीज यंत्रणेची तातडीने पाहणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

**नागरिकांनाच करावी लागते दुरुस्ती!**

तालुक्यातील अनेक गावांमध्ये महावितरण यंत्रणेची अवस्था खराब झालेली आहे. त्यामुळे पावसाळ्यात वारंवार तांत्रिक बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटना घडत आहेत.

## गळक्या एसटी बसेसमुळे प्रवाशांची गैरसोय !

### एसटी महामंडळाने तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी

प्रतिनिधी २८ जून

खामगाव: पावसाळा सुरू होताच गळक्या एसटी बसचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. खामगाव आगारातील काही बसच्या छतामधून पावसाचे पाणी गळत असल्याने प्रवाशांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे गळक्या बसची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

खामगाव आगारातून दररोज तालुक्यातील ग्रामीण भागासह जिल्ह्यातील विविध मार्गावर एसटी बसफेऱ्या सुरू असतात. ग्रामीण भागातील नागरिक, विद्यार्थी, शेतकरी, नोकरदार तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर एसटी सेवेवर अवलंबून आहेत; मात्र काही बसच्या छतामधून पावसाचे पाणी गळत असल्याने प्रवाशांना संपूर्ण प्रवासात जागा बदलत प्रवास करावा लागत असून, अनेकदा उभ्यानेही प्रवास करण्याची वेळ येते. बसमधील आसने भिजत असल्याने प्रवाशांचा प्रवास अधिक त्रासदायक ठरत आहे. पावसाळ्यात बसच्या आतील भागात पाणी साचल्याने घसरून अपघात होण्याची शक्यतादेखील निर्माण होत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

दरम्यान, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर गळक्या, तसेच तांत्रिकदृष्ट्या दोष असलेल्या बसची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांकडून करण्यात येत आहे.प्रवाशांना सुरक्षित, आरामदायी आणि दर्जेदार सेवा देण्यासाठी खामगाव आगारातील बसची नियमित देखभाल व तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

# संत मुक्ताईच्या पालखीचे भाविकांनी केले जल्लोषात स्वागत

प्रतिनिधी २८ जून

**मलकापुर:** आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या आदिशक्ती श्री संत मुक्ताबाई पालखीचे हजारो वारकऱ्यांसह मलकापूरकरांनी मोठ्या जल्लोषात स्वागत केले.

भीमातीर ते तापीतीर मार्गक्रमण करणारी आदिशक्ती श्री संत मुक्ताबाईंचा ३१९ वा पालखी सोहळा दि. २६ जून रोजी मलकापूरात दाखल झाला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्याजवळ नागरिकांनी मोठ्या जल्लोषात वारकऱ्यांचे स्वागत केले. ढोल-नगाऱ्यांच्या गजरात जेसीबीच्या साहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली. यावेळी विभागाचे आ.चैनसुख संचेती, माजी आ. राजेश एकडे, न.प उपाध्यक्ष अनिल गांधी, माजी जिप सदस्य संतोष रायपूरे, विविध पक्षांचे पुढारी , सामाजिक - धार्मिक संघटनांचे पदाधिकारी, पत्रकार, नागरिक व माता भगिनी दिंडी सोहळ्यात सहभागी झाले.

तहसील चौक परिसरात प्रशासनाच्या





वतीने उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे, तहसीलदार समाधान सोनवणे, शहर पो.नि. गणेश गिरी आदिंनी पालखीचे स्वागत करून पालखी सोहळा प्रमुख ह.भ.प. रवींद्र महाराज हरणे यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला. तसेच जिजाऊ फिटनेस क्लबच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत वारकऱ्यांना अभिवादन केले गेले.

शहरातील मुख्य मार्गाने दिंडीत सहभागी वारकऱ्यांच्या सेवेसाठी भाविकांकडून दूध, बिस्किटे, पिण्याचे पाणी आणि विविध प्रकारच्या खाद्यपदार्थांची व्यवस्था केली होती. टाळ - मृदुंगाच्या गजरात मार्गक्रमण करत सायंकाळी पालखी छत्रपती शिवराय मंगल कार्यालयात पोहोचली. येथे पानसरे परिवाराच्या वतीने भोजन व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली होती.

यानंतर भाविकांनी मुक्ताई पालखीचे दर्शन घेऊन रात्रीच्या कीर्तनाचा आनंद घेतला. या संपूर्ण सोहळ्यासाठी नगर परिषद कर्मचारी, प्रशासन वाहतूक पोलीस तसेच विविध सामाजिक संघटनांचे मोलाचे सहकार्य लाभल्याची भावना मुक्ताई संस्थानचे अध्यक्ष ॲड. रवींद्रभैय्या पाटील यांनी व्यक्त केली. येथील मुक्कामानंतर पुढील प्रवासासाठी मुक्ताई पालखी सोहळा आपल्या संपूर्ण लवाजम्यासह उद्या सकाळी ठिक ७ वाजता पंढरपूरच्या दिशेने मार्गस्थ होणार असल्याची माहिती आदिशक्ती संत मुक्ताबाई पालखी स्वागत सोहळा समिती मलकापूरचे व्यवस्थापक ह.भ.प नितीनदास महाजन आहिर यांनी दिली.

**शिस्त आणि नियोजनाचे उत्तम उदाहरण**

संत मुक्ताबाईंची पालखी म्हणजे शिस्त आणि नियोजनाचे उत्तम उदाहरणच म्हणावे लागेल. वारकऱ्यांमधील समन्वय, वेळेचे नियोजन आणि स्वयंशिस्त यातून पोलीस प्रशासनाचे काम सोपे झाले आणि कुणाच्याही गैरसोयीविना संपूर्ण सोहळा वेळेत पार पडला ही बाब सर्वच सामाजिक उत्सवांसाठी अनुकरणीय आहे.

**- शहर.पो.नि. गणेश गिरी**

मलकापूर शहरातील आबालवृद्ध भाविक भक्तांनी संत मुक्ताबाई पालखी सोहळयाचे जे स्वागत केले ते अभुतपूर्व होते. आपण केलेले आदरातिथ्य उपकृत करणारे होते. यामुळे सर्व वारकऱ्यांमध्ये पुढील प्रवासासाठी उत्साह निर्माण झाला आहे.

**ॲड. रवींद्रभैय्या पाटील**
अध्यक्ष, मुक्ताई संस्थान, मुक्ताई नगर

# सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

रविवार, दि. २८ जून २०२६ http://epaper.citynewssuperfast.com


# पातूरचा भोईपुरा, पाटील मंडळी परिसर जलमय

## देऊळगावला कार वाहून गेली, हिवरखेडला नुकसान



प्रतिनिधी २८ जून

**पातूर :** पातूर शहरात झालेल्या मुसळधार पावसामुळे भोईपुरा व पाटील मंडळी परिसरात अतिवृष्टीसदृश परिस्थिती निर्माण झाली. पावसाच्या पाण्याचा मोठा लोंढा घरांमध्ये शिरल्याने अनेक नागरिकांच्या घरातील संसारोपयोगी वस्तू, धान्य, फर्निचर व इतर साहित्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. अचानक आलेल्या पाण्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

घटनेची माहिती मिळताच पातूरचे नगराध्यक्ष हिदायत खा उर्फ इद्दू पैलवान, नगरसेवक अजय गजानन पाटील व मोहम्मद मेहताब यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन बाधित घरांची पाहणी केली. त्यांनी नागरिकांशी संवाद साधून त्यांचे सांत्वन केले तसेच आवश्यक ती मदत व प्रशासनाकडून नुकसानभरपाई मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. दरम्यान, परिसरात पाणी वेगाने साचत असताना काही नागरिक अडकून पडल्याची माहिती मिळताच माजी



नगरसेवक राजू उगले यांनी स्वतःच्या जीवाची पर्वा न करता वाहत्या पाण्यात उतरून नागरिकांना सुरक्षितस्थळी पोहोचविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या धाडसी कृतीचे परिसरातील नागरिकांनी कौतुक केले. नागरिकांनी या भागातील पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, तसेच नुकसानग्रस्त कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी प्रशासनाकडे केली आहे.

## हिवरखेडला पहिल्याच पावसाने पोलिस स्टेशनची दयनीय व्यवस्था

हिवरखेड येथे वादळी वारा आणि पावसामुळे हिवरखेड पोलीस स्टेशनचे मोठे नुकसान झाले असून, हिवरखेड पोलीस स्टेशनच्या ऐतिहासिक जुन्या इमारतीचे टीन पत्रे उडून गेले आहेत. यामध्ये अनेक पोलिसांचा जीव बाल बाल बचावला आणि मोठी दुर्घटना टळली. अनेक वर्षांपासून पोलीस स्टेशनची इमारत जीर्ण अवस्थेत असून आपला जीव मुठीत धरून पोलिसांना कर्तव्य बजावे लागत आहे. परंतु अनेक वर्षांपासून नागरिकांची आणि पोलिसांची मागणी असूनही पोलीस स्टेशनची आणि पोलीस वसाहतीची नवीन इमारत अजून पर्यंत उभारल्या गेली नाही. त्यामुळे शासन जी एस टी,आणि विविध प्रकारचा कोट्यावधीचा कर गोळा करूनही जर मूलभूत सुविधा देत नसेल तर नागरिकांचा आणि नागरिकांचे रक्षण करणाऱ्या पोलिसांचा जीव असाच धोकात ठेवायचा का?असा प्रश्न येथे उपस्थित होत आहे. उडालेले टिनछत गोळा करण्यासाठी पोलिस कर्मचाऱ्यांची चांगलीच दमछाक झाली शेवटी गृहरक्षकांनी व पोलिस स्टेनच्या आजुबाजूच्या नागरिकांनी , पत्रकार बांधवानी तत्परता दाखवली.हिवरखेड मध्ये २७, जूनला झालेल्या दुपारच्या पावसात गावात दोन ठिकाणी वीज पडली सुदैवाने जिवीतहानी टळली, परंतु यामध्ये पोलिस स्टेशन अपवाद ठरले. पोलिस स्टेशनचे टिनछत उडाले, मालखान्यात पाणी शिरले, कॉम्प्युटरच्या वायरिंग जळाल्या, दंगलनियंत्रनाचे साहित्य तोडफोड झाले, ध्वजारोहनाचा उंच लांब खांब कोसळला, झाडे झुडपे कोसळली, अनेक साहित्य नाश्तानाभूत झाले, शासनाने त्वरित व्यवस्था करावी, अशी मागणी जोर धरत आहे.





# अकोला शहरालाही पावसाने झोडपले

## ♦ शनिवारी रात्री सव्वा इंच पाऊस


प्रतिनिधी २८ जून


**अकोला :** शनिवारी रात्री झालेल्या मुसळधार पावसामुळे अकोला शहरात देखील तारांबळ उडाली. शनिवारी रात्री ३४ मिमी. पावसाची नोंद झाली. रस्त्यावर पाणीच पाणी होते तसेच गांधी चौकासह विविध भागात दुकानात पाणी शिरले. या पावसाळ्यातील पहिला दमदार पाऊस काल झाला. वीज पुरवठा देखील विस्कळीत झाला होता.

गांधी चौकात चौपाटी भागातील दुकानात पाणी शिरले. खुले नाट्यगृह परिसरात वाहून आलेला कचरा साचला. तोष्णीवाल लेआउट मध्ये प्रभात किडस समोर रस्त्यावर पाणी साचले. त्यामुळे येणाऱ्या जाणाऱ्यांची प्रचंड प्रमाणात धांदल उडाली. त्याच भागात दोन महिन्यापूर्वी शकील गॅरेज समोर तयार करण्यात आलेला रस्ता पावसामुळे उखडला. डाबकी रोडवर नाल्याचे पाणी रस्त्यावर आले. त्यामुळे अतिशय गलिच्छ स्थिती निर्माण झाली. या भागातील तुंबलेल्या नाल्यांची स्वच्छता झाली नाही हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले. मोर्णा नदीच्या पात्रात जलकुंभी स्वच्छता मोहीम अर्धवट राहिली हे पुन्हा अधोरेखित झाले. स्वच्छता कामे अजूनही मोठ्या प्रमाणात करण्याची गरज आहे असे मत शहरातील नागरिक व्यक्त करीत आहेत. कारण कालच्या मुसळधार पावसामुळे शहर स्वच्छतेचा बोजवारा उडालेला दिसला.









# तेल्हारा तालुक्यातील तळेगाव खुर्द व मालठाणा येथील 16 एकर शेती पाण्याखाली

## ♦ रेल्वे ठेकेदाराच्या चुकीमुळे संकट ओढवले असा शेतकऱ्यांचा आरोप



प्रतिनिधी २८ जून

**अकोला :** रेल्वे अधिकारी व ठेकेदारांच्या चुकीमुळे तेल्हारा तालुक्यातील तळेगाव खुर्द व मालठाणा येथील शेतकऱ्यांच्या शेतात पाणी साचले. १६ एकर शेती पाण्याखाली गेली असून अतोनात नुकसान झालेले आहे. ठेकेदारांनी पहाडातून आलेला नाला पूर्ण बंद केला. त्यामुळे पाणी सर्व शेतात थांबले आहे. प्रशासनाने तातडीने दखल घ्यावी अशी मागणी आहे. शेतकरी सतत अस्मानी आणि सुलतानी संकटाचा सामना करीत असतो. तेल्हारा तालुक्यातील शेतकऱ्यांनी रेल्वे प्रशासनावर खापर फोडले आहे. ठेकेदाराने आधीच्या नाल्याचे खोलीकरण करण्याऐवजी नाला बुजवला. त्यामुळे पावसाचे पाणी शेतात शिरले. त्यामुळे १६ एकर जमीन पाण्याखाली आली. कपाशी पिकाचे नुकसान झाले. रेल्वे प्रशासनाने पाहणी करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शेतकरी करीत आहेत.

# पुसदला अपर जिल्हाधिकारी कार्यालयाची मान्यता

**दिग्रस, उमरखेड, महागावचा समावेश**

प्रतिनिधी २८ जून

**यवतमाळ :** पुसद परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाची ठरणारी बाब म्हणजे राज्य शासनाने पुसद येथे नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात पुसदसह दिग्रस, उमरखेड आणि महागाव या चार तालुक्यांचा समावेश करण्यात आला असून यासंदर्भात हरकती व सूचना नोंदविण्यासाठी नागरिकांना १५ दिवसांची मुदत देण्यात आली आहे.

महसूल व वन विभागाच्या निर्णयानुसार अमरावती विभागातील यवतमाळ जिल्ह्यासाठी हे नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय पुसद येथे प्रस्तावित करण्यात आले आहे. प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ व गतिमान करण्याच्या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगण्यात येत आहे. जिल्हाधिकारी विकास मीना यांनी याबाबत सार्वजनिक सूचना प्रसिद्ध केली असून शासनाच्या निर्देशांनुसार मुख्यालय व कार्यक्षेत्र निश्चित करण्याचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. त्यानुसार लोकहित आणि प्रशासकीय सोयीचा विचार करून पुसद येथे मुख्यालय निश्चित करण्यात आले आहे. सूचनेनुसार, कार्यक्षेत्र निश्चित करताना तालुका हा मूलभूत घटक मानण्यात आला असून कोणत्याही तालुक्याचे विभाजन करण्यात आलेले नाही. त्यामुळे पुसद, दिग्रस, उमरखेड आणि महागाव हे चारही तालुके संपूर्णपणे नव्या कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात राहणार आहेत. दरम्यान, या प्रस्तावाबाबत नागरिकांना काही हरकती किंवा सूचना असल्यास, जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत त्या लेखी स्वरूपात जिल्हाधिकारी कार्यालय, यवतमाळ येथे सादर कराव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्राप्त सूचना व हरकतींचा विचार करून अंतिम प्रस्ताव विभागीय आयुक्तांमार्फत शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्यात येणार आहे. नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय सुरू झाल्यानंतर पुसद विभागातील नागरिकांना अनेक महसुली कामांसाठी यवतमाळ मुख्यालयावर जाण्याची गरज कमी होणार असून प्रशासकीय सेवा अधिक वेगाने उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# दोनदच्या काटेपूर्णा नदीत बुडाल्याने मृत्यू



प्रतिनिधी २८ जून

**बार्शिटाकळी :** बार्शिटाकळी तालुक्यातील दोनच खुर्द च्या काटेपूर्णा नदीत एका व्यक्तीचा बुडाल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. पिंजर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, बार्शिटाकळी तालुक्यातील दोनद येथील आसरा माता मंदिरात शनिवार २७ जूनला दर्शनसाठी व महाप्रसादासाठी आलेल्या मूर्तिजापूर तालुक्यातील सिरसो गायरान येथील ज्ञानेश्वर दादाराव सोळंके (३५) हे काटेपूर्णा नदीपात्रात गेल्यानंतर पाण्यात बुडाल्याची माहिती पिंजर पोलिसांना दिली. पिंजर पोलीस स्टेशनचे एपीआय गजानन राठोड यांनी तात्काळ पिंजरचे आपात्कालीन शोध व बचाव पथकाला दिल्यानंतर तात्काळ घटनास्थळावर उपस्थित झाले. शोध व बचाव पथकाचे दिपक सदाफळे, मयुर सळेदार, शेखर ज्ञानेश्वर सोनके, केवट, रोशन सपकाळ, अक्षय भड, साहील देशमुख, सचिन कुकडे, पवन भड, हर्षल वानखडे यांच्या चमुने या व्यक्तीचा मृतदेह पाण्याबाहेर काढला. मृतदेहाचे शवविच्छेदन करण्याकरिता मूर्तिजापूर येथील रुग्णालयात पाठविण्यात आले. यावेळी पिंजर पोलीस ठाण्याचे एपीआय गजानन राठोड, पीएसआय अभिषेक वनघरे, पोहेकॉ सुभाष उघडे, चालक नागेश दंदी व नातेवाईक हजर होते. घटने संदर्भात पोलिसांनी मर्ग दाखल केला.

## मलकापुरात संत मुक्ताईच्या पालखीचे जल्लोषात स्वागत..!




**मलकापूर :** आषाढी एकादशीनिमित्त भीमातीर ते तापीतीर मार्गक्रमण करणारी आदिशक्ती श्री संत मुक्ताबाईंचा ३१९ वा पालखी सोहळा २६ जून रोजी मलकापूरात दाखल झाला. यावेळी छत्रपती शिवाजी महाराज पुतळयाजवळ नागरिकांनी मोठ्या जल्लोषात वारकऱ्यांचे स्वागत केले. ढोल-नगाऱ्यांच्या गजरात जेसीबीच्या साहाय्याने पुष्पवृष्टी करण्यात आली.

# मेहकर तालुक्यातील परतापूर येथे घरातच गर्भलिंग निदान !

प्रतिनिधी २८ जून

**बुलढाणा :** मेहकर तालुक्यातील परतापूर येथे एका घरात महिलेची सोनोग्राफी मशिनद्वारे गर्भलिंग निदान चाचणी करीत असतानाच एका बोगस डॉक्टरला पीसीपीएनडीटी पथकाने रंगेहात पकडले. शनिवारी दुपारी तीन वाजताच्या सुमारास पोलिसांच्या मदतीने छापा टाकून डॉक्टरला ताब्यात घेण्यात आले. तसेच सोनोग्राफी मशिन व वैद्यकीय साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणी घरमालकासह डॉक्टरविरुद्ध गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती. अनिल रामदास सोनुने असे बोगस डॉक्टरचे नाव आहे. मेहकर तालुक्यातील परतापूर येथे रसाळ नावाच्या व्यक्तीच्या घरात बेकायदा गर्भलिंग निदान चाचणी केली जात असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांना मिळाली. त्यांनी तातडीने पीसीपीएनडीटी पथकाला अलर्ट केले. सापळा रचण्यात आला. परतापूर येथे रसाळ याच्या घरावर सकाळी ११ वाजेपासून पाळत ठेवली. बोगस डॉक्टर अनिल सोनुने हा दुपारी अडीच, तीनच्या सुमारास रसाळच्या घरात शिरल्यानंतर त्याने महिलेच्या गर्भाचे सोनोग्राफी मशिनद्वारे लिंग निदान सुरू केले. त्याचक्षणी छापा मारून डॉक्टरला रंगेहात पकडण्यात आले.







हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क** - 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135


CMYK CMYK